स्नेह भोज
स्वाद दिल से दिल तक!
बारसे, डोहाळे जेवण, साखरपुडा, गेट टू गेदर
अश्या छोटेखानी समारंभांसाठी
परफेक्ट हॉल आणि सोबत
स्नेहभोजची रुचकर थाळी सुद्धा...
बजेटमध्ये
सुटसुटीत कार्यक्रम
रुचिरा टॉवर्स, झोपडी कॅन्टीन, सावेडी, अहमदनगर
86 98 8080 88

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा
व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

होय..आम्ही घेतोय
आपल्या डोळ्यांची काळजी..
ऑप्टोमेट्रिस्टकडून डोळ्यांची
दररोज मोफत तपासणी
एकदा अवश्य भेट द्या व खात्री कराच
- नंबरचा चष्मा फक्त रु. 299 रुपयात
- प्रोग्रेसिव्ह चष्मा फक्त रु. 900 रुपयात
- ब्लूकट चष्मा फक्त रु. 500 रुपयात
अहमदनगरचे सुप्रसिध्द
अंजली चष्मावाला
पत्ता : शिवशक्ती कॉम्प्लेक्स, पटेल मेडिकलजवळ,
चितळेरोड, अहमदनगर, मो : 8796824353

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, मंगळवार दि. ०७.०५.२०२४ | अंक नं. ०५५ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

अक्षय तृतीया
अक्षय्य तृतीयेच्या हार्दिक शुभेच्छा!
शिंगवी ज्वेलर्स
हथ्थी चौक, सर्जेपुरा, अ.नगर.
7875777001
मंगळसूत्र महोत्सव
मजूरी फक्त
6.9%
* नियम व अटी लागू

# शहरातील बाजारपेठेत दुकानांसमोरच साचलेत कचऱ्याचे मोठ-मोठे ‘ढिगारे’

### व्यापारी व्यावसायिकांसह नागरिकही त्रस्त, महापालिका प्रशासन व ठेकेदार संस्थेचे दुर्लक्ष



रामचंद्र खुंट परिसरात दुकानांसमोरच साचलेले कचऱ्याचे ढिगारे अन् त्यावर फिरत असलेली मोकाट जनावरे.

नगर - शहरातील बाजारपेठांमध्ये सध्या कचऱ्याचे मोठ्या प्रमाणात ढिगारे साचले असून महापालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे. घंटागाड्यांचे चालक आपल्या सोयीनुसार कचऱ्याचे संकलन करत असल्याने काही भागात दिवसभर कचरा पडून राहतो. विशेषतः बाजारपेठेत दुकाने सुरू होण्यापूर्वी कचरा उचलला जात नसल्याने व्यापारी, व्यावसायिकांसह ग्राहकांनाही त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. रामचंद्र खुंट येथे ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचले असून मागील काही दिवसांपासून ते कचरा वाहतूक करणाऱ्या संस्थेकडून उचलले गेले नसल्याने परिसरात अस्वच्छता पसरली आहे. या ढिगाऱ्यांवर मोकाट जनावरे फिरत असल्याने त्यांच्या मलमुत्रामुळे या कचऱ्याचा कुबट वास सुटला आहे.

शहरात सफाई कर्मचाऱ्यांमार्फत दैनंदिन सफाईचे कामकाज केले जाते. झाडलोट करून रस्ते, गल्लीबोळातील कचऱ्याचे ठिकठिकाणी संकलन केले जाते. सदर कचऱ्याचे ढिगारे घंटागाडी, ट्रॅक्टरच्या माध्यमातून उचलले जातात. परंतु रामचंद्र खुंट परिसरात मागील चार-सहा दिवसांपासून जमा केलेल्या कचऱ्याचे ढिगारे तसेच पडलेले असून, मोकाट जनावरांमुळे सदरचा कचरा रस्त्यावर पसरला जात आहे. या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी, अस्वच्छता पसरल्याने व्यापारी व्यावसायिक त्रस्त झाले आहेत. महापालिका तसेच घंटागाडी चालकांना वारंवार फोन करून अथवा प्रत्यक्ष भेटून विनंती केल्यानंतरही कचऱ्याचे ढिगारे उचलले जात नसल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

यापूर्वीही आडतेबाजार या गजबजलेल्या बाजारपेठेत ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढिगारे दुपारी उशिरापर्यंत तसेच पडून राहात असल्याने तेथील व्यापारी व्यावसायिकांनी महापालिकेकडे तक्रार केली होती. परंतु याचा फारसा परिणाम दिसून आला नाही. प्रशासन नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत नसल्याचेच यातून दिसून येते.

या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये प्लॅस्टिक, कागद तसेच ओला कचरा आणि काहीवेळा मेलेल्या प्राण्यांचे अवशेषही असतात. त्यामुळे सर्वत्र अस्वच्छता, घाण पसरते. तसेच दुर्गंधीही सुटते. त्यामुळे दुकानात येणारे ग्राहकही त्रस्त झाले आहेत. महापालिका प्रशासनाने याबाबत गांभीर्याने दखल घेऊन बाजार पेठेतील कचरा संकलन लवकर करून तो उचलण्याबाबत संबंधित ठेकेदार संस्था आणि घंटागाडी, कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना सूचना कराव्यात, अशी मागणी बाजारपेठेतून होत आहे.

### पंतप्रधान कार्यालयाच्या आदेशाचीही प्रत्यक्ष अंमलबजावणी नाही

मध्यंतरी शहरातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यांबाबत महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रारीची पंतप्रधान कार्यालयाने दखल घेऊन कार्यवाहीचे आदेश दिले होते, परंतु प्रत्यक्षात मात्र त्या आदेशाची अंमलबजावणी प्रशासनाने केली नसल्याचेच स्पष्ट झाले आहे.



## दुष्काळातही पाण्याचे ‘मोल’ शुन्यच का?

दुष्काळी परिस्थितीमुळे सध्या सर्वांनाच पाणी टंचाईची समस्या भेडसावत आहे. पाणी टंचाईच्या या भीषण संकटातही काहींना मात्र पाण्याचे ‘मोल’ उमगलेले नसून भिंगार पासून पुढे पाथर्डी रस्त्याने चाललेल्या टँकरमधून पाण्याची मोठ्या प्रमाणात गळती होत असल्याचे छायाचित्र टिपले आहे व्यापारी मनिष गुगळे यांनी.

# राज्यात उष्णतेची लाट; नगर शहरात ४२ अंश सेल्सिअस तापमान

पुणे - राज्यभरात सध्या उष्णतेची लाट आली असून नगरसह ११ जिल्ह्यांचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. त्यामुळे असह्य उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. नगरमध्ये ४२ अंश सेल्सिअस तापमानाची झाली नोंद झाली आहे. उष्णतेची ही लाट आणखी काही दिवस राहणार असल्याचा अंदाज वेधशाळेने वर्तविला आहे.

सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला आहे. कोकण किनारपट्टी भागात उष्णतेच्या लाटेचा अलर्ट देण्यात आला आहे. विदर्भाच्या तापमानातही मोठी वाढ झाली. अशातच मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली. सोलापूर आणि अकोला येथे ४४.४ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली. तर बीड ४३.२ अंश सेल्सिअस, नगर ४२, छत्रपती संभाजीनगर ४१.२, जळगाव ४२.२, मालेगाव ४२.६, नांदेड ४२.६, धाराशिव ४१.८, परभणी ४२.६, सांगली ४१.१, सातारा ४० अंश सेल्सिअस असे कमाल तापमान नोंदवले गेले.

पश्चिम महाराष्ट्रात गेल्या ८ दिवसापासून उष्णतेची लाट असल्याचे चित्र आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि कोल्हापूरमध्ये प्रचंड उकाडा जाणवत आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी प्रचंड उष्णता असल्याचे चित्र आहे.

विदर्भातील अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा याठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तर यवतमाळ, भंडारा, गोंदिया, वाशिम, गडचिरोली आणि नागपूर याठिकाणी तापमानाचा पारा वाढत आहे.

उत्तर महाराष्ट्रातील तापमानात कमालीची वाढ झाली आहे. हवेच्या वरच्या स्तरात प्रती चक्रवाताची स्थिती तयार झाल्याने कमाल - किमान तापमानात मोठी वाढ झाली आहे. नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव या चार जिल्ह्यातील तापमानात वाढले आहे.

दरम्यान, उन्हाची वाढती तीव्रता नागरिकांसाठी तापदायक ठरते. उन्हाचा कडाका वाढल्याने उष्माघाताचा धोका निर्माण होऊ नये यासाठी योग्य ती काळजी घ्यावी लागणार आहे.

त्वरित पाहिजेत
अकौंटंट - जागा २
(Tally चे ज्ञान आवश्यक)
-: संपर्क :-
एम. आर. भिंगारवाला
माणिक चौक, अहमदनगर
(रविवार बंद)

दर्जेदार
फ्लेक्स
प्रिंटींग
9403232323



ऐकु कमी येते का?
30 % डिस्काउंट
सर्व डिजीटल कानाच्या मशीनवर ३०% सूट
उपलब्ध सुविधा :
* श्रवण तपासणी
* रिचार्जेबल आणि ब्ल्यूटूथ श्रवण यंत्र
* डिजीटल व साधे श्रवण यंत्र
* श्रवण यंत्राविषयी मोफत मार्गदर्शन
* श्रवण यंत्र दुरुस्ती
* सर्व नामवंत इंपोर्टेड कंपन्यांचे श्रवण यंत्र
* ज्येष्ठ नागरिकांसाठी होम व्हिजीट सुविधा उपलब्ध.
डॉ.विलास राठोड (BASLP/DNYS)
व्हिआर स्पीच & हेअरिंग क्लिनिक
विठ्ठल अपार्टमेंट,पाईपलाईन रोड, भिस्तबाग चौक, अ.नगर. Mo. 9657 588 677

लवकरच मिळणार !
परिवारातल्या प्रत्येकाला
खुश करायची संधी
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

## जाहीर प्रकटन

मी **प्रदीप मोतीलाल कुलथे** रा.सिव्हिल हडको, समता चौक, आज रोजी ०७/०५/२०२४ रोजी प्रकटन करतो की,

मी माझा मुलगा **आकाश प्रदीप कुलथे** रा. सिव्हिल हडको याच्या विरुद्ध आमच्या काही कौटुंबिक कारणास्तव नोव्हेंबर २०१८ रोजी जाहीर नोटीस दिली होती. तरी आज रोजी मी **प्रदिप मोतीलाल कुलथे** या जाहीर प्रकटनाद्वारे असे घोषित करतो की, माझा मुलगा **आकाश प्रदीप कुलथे** याच्याशी आमचा कौटुंबिक वाद संपुष्टात आला असून मी असे जाहीर करतो की, मी **प्रदीप मोतीलाल कुलथे** माझ्या संपूर्ण मालमत्तेचा वारसदार म्हणून माझा मुलगा **आकाश प्रदीप कुलथे** हा असून त्यासोबत कोणीही, कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार केल्यास त्यासाठी माझी व्यवहार करण्याविरुद्ध काही हरकत अथवा तक्रार राहणार नाही.

असे मी आज रोजी ०७/०५/२०२४ जाहीर प्रकट करतो.

**प्रदीप मोतीलाल कुलथे**

॥ कुलस्वामिनी प्रसन्न ॥
शेअरिंग कॅब
डेली सर्व्हीस
नगर-पुणे-नगर
आता आपल्या शहरातुन
दररोज
- नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
- पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट -भिस्तबाग चौक,झोपडी कॅन्टीन, तारकपूर,दिल्लीगेट, राज पॅलेस चौक,कायनेटिक चौक,केडगाव
पुणे ड्रॉप- वाघोली, खराडी बायपास,येरवडा, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड. बुकिंग आवश्यक
अमर-प्रेम हॉलिडेज्
ऑफिस- चितळेरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

An ISO 9001:2015 Certified
DiSHA
COMPUTER INSTITUTE
Experts In Computer Training
MAHA offer DiSCOUNT
Just in 1800 Any Course
JOIN TODAY
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, PHOTOSHOP, CORELDRAW, IILUSTRATOR, INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
An ISO 9001:2015 Certified
DiSHA
COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

तृतीय पुण्यस्मरण

**कै.श्री. अंबादास बाबुराव पंगुडवाले**

स्व.दि. ०७/०५/२०२१

(जेष्ठ समाजसेवक विविध पुरस्कार भुषण)

साथ सुटली लाख मोलाची, छाया विरली वटवृक्षाची,
ज्योत विझली आशेची, वाट पाहतो आम्ही आपल्या पुनः जन्माची !

आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली..

* शोकाकुल - समस्त पंगुडवाले परिवार

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## आत्मविश्वास – यशस्वी होण्याची गुरुकिल्ली

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : “मुसाफिर”–९८२२०२०६९१

‘इफ यु हॅव नो कॉन्फीडन्स इन युवरसेल्फ, यु आर डिफीटेड ट्वाइसली (दोनदा) इन द रेस ऑफ लाईफ’ या प्रसिद्ध वचनाद्वारे आत्मविश्वासाचे महत्त्व कळते.

जगण्याच्या लढाईत पैशा–संपत्तीसह महत्त्वाचा असतो तो आत्मविश्वास. ठामपणे, स्वतःच्या हिंमतीने निरंतर कार्यरत राहणं यातून आत्मविश्वास दिसून येतो. कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल, तर आत्मविश्वास असणे गरजेचे आहे.

आत्मविश्वास नसेल तर कोणतीच गोष्ट साध्य करता येत नाही. क्षेत्र कोणतेही असो नोकरी, व्यवसाय, प्रेम, संसार, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, क्रीडा इ.इ. आत्मविश्वासच तारून घेतो.

विशेषतः युवा मित्रांनी परीक्षेला सामोरे जातांना, मुलाखतीला प्रत्येक ठिकाणी आत्मविश्वास दिसायला पाहिजे. त्याच्या अभावी अनेक गुणवान विद्यार्थी व जीवनात माणसं अपयशी ठरतात.

आत्मविश्वास आणण्यासाठी साधारण अभ्यास, माहिती घेण्याबरोबरच उत्तम पेहराव ठेवणे, योग्य वेगवान चालणे, चांगली ठेवण, देहबोली आणि समोरच्याचे कौतुक करून नेहमी कृतज्ञता ठेवणे आवश्यक. मग पहा... दुनिया तुम्ही मुठ्ठीमे...

# बुऱ्हाणनगरमध्ये टोळक्याकडून तरुणावर प्राणघातक हल्ला

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ६ जणांना घेतले ताब्यात

नगर – नगर तालुक्यातील बुऱ्हाणनगर शिवारात एका तरुणावर टोळक्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना काल सोमवारी (दि.६) सायंकाळी घडली. पुष्कर शेलार (पूर्ण नाव नाही) असे हल्ला झालेल्या तरुणाचे नाव आहे. हल्ल्यात तो जखमी झाला असून त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दरम्यान पूर्ववैमनस्यातून हा हल्ला झाला असल्याची प्राथमिक माहिती असून जखमी तरुणाचा जबाब नोंदविल्यानंतर हल्ल्याचे कारण समोर येईल असे भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक योगेश राजगुरू यांनी सांगितले. शेलार व स्थानिक तरुणाचे यापूर्वी वाद झाले असल्याची माहिती समजली. याच वादातून काही तरुणांनी शेलार यांना सोमवारी सायंकाळी बुऱ्हाणनगर– भिंगार रस्त्यावर गाठले. तेथे त्यांच्यावर हल्ला केला. त्यात ते जखमी झाले असून स्थानिकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान घटनेची माहिती मिळताच राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह हिंदुत्ववादी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रुग्णालय धाव घेतली होती. याबाबत मंगळवारी (दि.७) दुपारपर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता. जखमी तरुणाचा जबाब नोंदविल्यानंतर गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे सहायक निरीक्षक राजगुरू यांनी सांगितले. दरम्यान या हल्लेखोरांपैकी ६ जणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असल्याचे सांगण्यात आले.

# नगरमध्ये १० मे रोजी ‘निर्भय बनो सभा’

## डॉ. विश्वंभर चौधरी, ॲड. असीम सरोदे प्रमुख वक्ते तर ॲड. निशा शिवूरकर अध्यक्ष

जागे व्हा ! धोक्याची घंटा वाजली आहे!
निर्भय बनो
नागरिकांशी संवाद

नगर – प्रत्येक नागरिकाने जागे होणे गरजेचे आहे कारण धोक्याची घंटा वाजली आहे, नागरिकांनी सत्य ऐकायला १० मे रोजी डॉ. विश्वंभर चौधरी आणि ॲड. असीम सरोदे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या निर्भय बनो सभेत यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

देशातील लोकशाही ही अधिक प्रबळ व्हावी व देशात संविधानाप्रमाणे सुशासन असावे या उद्देशाने जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी सामाजिक काम करणाऱ्या लोकांनी एकत्रित येत निर्भय बनो चळवळ सुरू केलेली आहे. सध्या देशातील एकंदरीत वातावरण हे लोकशाहीकरीता मारक असून संविधानाची पायमल्ली होत आहे. अलिखित आणीबाणी आणि हुकमशाही सदृश्य परिस्थिती आहे, सरकारच्या विरुद्ध जनहीतार्थ आवाज उठविणाऱ्यांचा आवाज दाबला जात आहे, तसेच धर्म आणि जातीच्या आधारे देशात द्वेषपूर्ण वातावरण पसरविण्यात येत आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे, प्रसिद्धीमाध्यमे विशेषतः इलेक्ट्रॉनिक मिडीया ही एकांगी सत्ताधारींच्या बाजूने वार्तांकन करत असल्याने तसेच काही राज्यकर्ते सत्तेचा आणि सोशल मिडीयाचा दुरुपयोग करत जनतेपर्यंत सत्य आणि खरी परीस्थिती पोहचू देत नसल्याने जनतेची दिशाभूल होत आहे. मणिपुर, लडाख, नागालँड मधील शांतता भंग झाली आहे, कृषी मालाला योग्य भाव नसल्याने व उत्पन्न खर्च वाढल्याने शेतकरी अधिक कर्जबाजारी होत आहेत आणि आत्महत्या करत आहेत, बेरोजगारीमुळे तरुणवर्ग पिचत आहे, महिला अत्याचारावर सरकार मौन आहे तर महागाईचा आगडोंब उसळलेला आहे. भ्रष्टाचार, फोडाफोडीचे राजकारण आणि राजकारणातील संधिसाधूपणामुळे नागरिकांनाच्या मुलभूत हक्क अधिकारांची पायमल्ली होत असून नागरिकांचे मूलभूत प्रश्न हे हरवलेले आहेत.

संविधानाची प्रतिष्ठा वाढेल अशा लोकशाहीसाठी आपले योगदान देण्याची हिच खरी वेळ आहे. याबाबत जनजागृती करण्याकरिता या चळवळीच्या महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात आतापर्यंत ५५ पेक्षा अधिक सभा झालेल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर नगर जिल्ह्यात जनजागृती करिता १० मे रोजी सायंकाळी सहा वाजता माऊली सभागृह, तलाठी संकुल, झोपडी कँटीन, मनमाड रोड, सावेडी, अहमदनगर येथे नागरिकांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था यांनी एकत्रित येवून केलेले आहे. यामध्ये डॉ. विश्वंभर चौधरी आणि ॲड. असीम सरोदे हे प्रमुख वक्ते असणार आहेत तर ॲड. निशा शिवूरकर या कार्यक्रमाच्या अध्यक्ष असणार आहे.

तरी संविधान आणि लोकशाहीप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमासाठी उपस्थितीत राहावे, अशी विनंती संयोजकांच्या वतीने संध्या मेढे, युनूस तांबटकर, ॲड. श्याम आसावा, ॲड. संतोष गायकवाड, अशोक सब्बन, आनंद शितोळे, फिरोज शेख, भैरवनाथ वाकळे आदींनी केली आहे.

# नगरजवळ २ रस्ते अपघातात दोघांचा मृत्यू

## नगर कल्याण रोड व मनमाड रोडवरील घटना

नगर – नगर शहराजवळ सोमवारी (दि.६) दोन रस्ते अपघात झाले असून त्यात दोघांचा मृत्यू झाला आहे. पहिला अपघात पहाटे ४ च्या सुमारास नगर कल्याण रोडवर टाकळी खातगाव गावच्या शिवारात तर दुसरा अपघात नगर मनमाड रोडवर बोल्हेगाव फाटा परिसरात सकाळी ७.३० च्या सुमारास घडला आहे.

कल्याण रोडवरील अपघातात निलेश दत्तात्रय ढोणे (वय २१, रा.भाळवणी ता.पारनेर) हा युवक मयत झाला आहे. तो सोमवारी पहाटे ४ च्या सुमारास भाळवणी वरून कल्याण रोडने मोटारसायकल वर नगर कडे येत असताना टाकळी खातगाव गावच्या शिवारात हॉटेल साईराज समोर एका भरधाव वेगात चाललेल्या मालट्रकने त्याच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याला रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दुसरा अपघात नगर मनमाड रोडवर बोल्हेगाव फाटा परिसरात हॉटेल चैतन्य समोर सकाळी ७.३० च्या सुमारास घडला. यात एम आयडीसीतील एका कंपनीत काम करणारे किरण गंगाधर कडेकर (वय ४१, रा. बालिकाश्रम रोड, नगर, मूळ रा. कोरडगाव, ता.पाथर्डी) यांचा मृत्यू झाला आहे. ते कंपनीत कामाला मोटारसायकलवर जात असताना बोल्हेगाव फाटा येथे एका मालवाहू टेम्पोने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. त्यात ते जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी त्यांना उपचारासाठी एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचार सुरु असताना रात्री १० च्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# कांदा निर्यातीला सरकारचा खोडा

नगर – कांदा निर्यातीची सशर्त परवानगी देऊनसुद्धा सरकारच्या कारभारातील सावळ्यागोंधळामुळे कांदा बंदरावर सडत आहे. निर्यात शुल्क नेमके किती याबाबत अद्याप स्पष्टता नसल्यामुळे निर्यात सुरू नाही, अशी माहिती स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी पत्रकारांना दिली.

केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने ३ मे रोजी अध्यादेश काढून भारतातून कांदा निर्यात करण्यास परवानगी दिली. ५५० डॉलर प्रतिटन किमान निर्यात मूल्य व ४० टक्के निर्यात शुल्क अशा निर्यातीच्या अटी ठेवण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय बाजारात चांगले दर पाहता, व्यापाऱ्यांनी जास्त दर देऊन कांदा खेरदी केला व निर्यातीसाठी बंदरावर पाठवला आहे. मात्र कांदा निर्यात शुल्क ४०% नसून ५०% आहे असे बंदरा वरील सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले.

निर्यात शुल्क ४० ऐवजी ५० टक्के आकरल्यास, जो कांदा ६४ रुपयात निर्यात झाला असता त्याला आता ७० रुपये मोजावे लागणार. या दरात अखाती देशात कांदा निर्यात होणे शक्य नाही.

निर्यात शुल्क नेमके किती हा निर्णय आज चार दिवस झाले तरी स्पष्ट होऊ शकले नाही. निर्यातीसाठी कंटेनरमध्ये भरलेला कांदा सडण्याची शक्यता आहे. बंदरावर उभ्या असलेल्या कंटेनर व ट्रकचे ज्यादा भाडे निर्यातदारांना द्यावे लागणार आहे व तातडीने निर्णय न झाल्यास पूर्ण कांदा सडण्याची भीती आहे.

या गोंधळाचा फटका पुन्हा शेतकऱ्यांना बसला आहे. निर्यात खुली झाल्यानंतर कांद्याचे दर १५ रुपये किलो वरून २२ ते २५ रुपया पर्यंत वधारले होते. कांदा निर्यात होत नसल्याचे लक्षात येताच कांद्याचे दर पुन्हा १५ रुपयाच्या दरम्यान घसरले आहेत. कांदा निर्यातबंदी करायची असल्यास काही तासात अंमलबजावणी केली जाते मात्र कांदा निर्यात सुरू करायची आहे तर कित्येक दिवसापासून घोळ घातला जात आहे. शासनाचे सर्व आदेश ऑनलाईन उपलब्ध होतात. संबंधित मंत्री व अधिकाऱ्यांशी संपर्क करणे ही सहज शक्य असताना हा विलंब का? व्यापारी, निर्यातदार व शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नुकसानीला जबाबदार कोण? असा प्रश्न निर्माण होत आहे.

कांदा पट्ट्यात निवडणुका सुरु आहेत व कांदा उत्पादकांची मते मिळविण्यासाठी निर्यात खुली केल्याचा देखावा केला आहे. मात्र कांद्याचे दर वाढू नयेत म्हणून निर्यात शुल्काचा घोळ घातला जात आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या तोट्याला व व्यापारी, निर्यातदार यांच्या नुकसानीला केंद्र सरकार जबाबदार आहे. हा तिढा लवकर सुटला नाही तर याचा मतदानावर मोठा परिणाम होईल असे मत अनिल घनवट यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

## सरुबाई पवार यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – चिचोंडी पाटील (ता. नगर) येथील रहिवासी सरुबाई बाजीराव पवार (वय ९७) यांचे ५ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. चिचोंडी पाटील येथील गितांजली हॉस्पिटलचे डॉ.विजय पवार व प्रा. जयदीप पवार, खुंटेफळ येथील लोकमान्य शिक्षण संस्थेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबासाहेब पवार यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात ३ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# ट्रॅक्टर उलटल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

संजय जाधव

राहुरी – ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतात रोटाव्हेटर मारत असताना ट्रॅक्टर उलटून शेतकरी ट्रॅक्टरखाली दबून जागेवर ठार झाला. ही घटना राहुरी तालुक्यातील दरडगाव थडी येथे सोमवारी (दि.६) सकाळी घडली. संजय सीताराम जाधव (वय ४३) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे.

मयत जाधव यांची दरडगावथडी येथे मुळा नदीकाठी शेतजमीन आहे. ते सकाळी १०.३०वाजे दरम्यान त्यांच्या शेतात ट्रॅक्टरच्या सहाय्याने रोटा मारीत होते. यावेळी ट्रॅक्टरचे चाक बांधावर जाऊन ट्रॅक्टर उलटला आणि संजय जाधव हा शेतकरी ट्रॅक्टर खाली दबला गेला. तेव्हा परिसरातील मच्छिंद्र जाधव, बाबुराव दोंदे, बापूसाहेब रोकडे, संदीप जाधव, मधुकर जाधव यांच्यासह अनेक तरुणांनी तात्काळ मदतकार्य करून जेसीबीच्या सहाय्याने ट्रॅक्टर उचलला आणि संजय जाधव या शेतकर्याला बाहेर काढले.

जाधव यांना तात्काळ राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र, वैद्यकीय अधिकारी आंबरे यांनी संजय जाधव यांना तपासून उपचारा पूर्वीच मयत घोषित केले. संजय जाधव यांचे मित्र व नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात गर्दी केली होती. दुपारी उशिरापर्यंत संजय जाधव यांचे शवविच्छेदन सुरू होते. संजय जाधव यांच्या अपघाती निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगी, मुलगा, बहिण, भाऊ असा परिवार आहे. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# नगर–पुणे महामार्गावर घाटात कारचालकाला अडवून ११ लाख ६५ हजारांचा ऐवज लुटला

नगर – नगर–पुणे महामार्गावर सुप्या जवळ असलेल्या पवार वाडी घाटात कारचालकाला मोटारसायकल आडवी लावून अज्ञात तीन चोरट्यांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवत, मारहाण करत सुमारे ११ लाख ६५ हजारांचा ऐवज लुटून नेल्याची घटना सोमवारी (दि.६) पहाटे ३ वाजेच्या सुमारास घडली आहे.

याबाबत श्रीधर दत्तात्रय वर्धे (वय, ५७ वर्षे रा. शाकुंतला अपार्टमेंट, सदाशिव पेठ, जि. पुणे) यांच्या फिर्यादीवरुन सूपा पोलीस ठाण्यात अज्ञात तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी हे दि.५ मे रोजी त्यांच्या मित्रासोबत कामाच्या निमित्ताने आले होते. ते सोमवारी पहाटे पुन्हा घरी पुण्याच्या दिशेने जात असतांना ३ वाजेच्या सुमारास नगर–पुणे महामार्गावरील पवार वाडी घाटात काळ्या विनानंबरच्या पल्सर मोटार सायकलवरून अज्ञात तीन जणांनी त्यांचा पाठलाग केला.

रस्त्यावर दुचाकी आडवी लावून अनोळखी तीन जणांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवत त्यांच्याकडील २० हजार रुपये किंमतीची एक सोन्याची अंगठी, ८० हजार रुपये किंमतीची सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये एक कॅरेट वजनाचा हिरा असलेली ६ ग्रॅम वजनाची अंगठी, ५० हजार रुपये किंमतीची २० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी, ५० हजार रुपये किंमतीचे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे हातातील कडे, ५ लाख रुपये किंमतीची सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये पुष्कराज खडा असलेली २० ग्रॅम वजनाची अंगठी, ९० हजार रुपये किंमतीची सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये हिरा असलेली १० ग्रॅम वजनाची अंगठी, २ लाख ५० हजार रुपये किंमतीची सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली साखळी, ९० हजार रुपये किंमतीची पांढऱ्या सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली अंगठी.

तसेच खिशातील पाकीट त्यामध्ये एस.बी.आय.चे क्रेडेट कार्ड, डेबीट कार्ड, विश्वेश्वर बँक २ डेबीट कार्ड, एक्सेस बँकेचे डेबीट कार्ड, शरद सहकारी बँकेचे डेबीट कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, इसकॉन लाईफ मेंबरशिप कार्ड, ३५ हजार रुपयांच्या चलनी नोटा असा एकूण ११ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल लटून नेला. घटना घडल्यानंतर फिर्यादी यांनी पोलीस ठाणे गाठले. आपल्यावर झालेला प्रकार पोलीसांसमोर कथन केला. नंतर सुपा पोलिसांनी अज्ञात ३ जणांविरोधात भा.दं. वि.कलम ३९४, शस्त्र अधिनियम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# उष्माघाताने नगरमधील ११ वर्षीय बालकाचा मृत्यू

साई मुसमाडे

राहुरी – राहुरी तालुक्यातील तांभेरे येथील ११ वर्षाच्या साई गोरक्षनाथ मुसमाडे या चिमुकल्याचा उष्मघाताने मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.५) घडली आहे. वाढत्या उन्हामुळे चिमुकला साई याचा बळी गेल्याने नागरिकांत हळहळ व्यक्त होत आहे.

तांभेरे येथील गोरक्षनाथ मुसमाडे यांचा एकुलता मुलगा साई हा इयत्ता ५ वीच्या वर्गात शिक्षण घेत होता. उन्हाचा तडाखा बसल्याने साई याला उलट्या व जुलाबाचा त्रास सुरू झाला. त्यानंतर त्याला लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

उन्हाचा तडाखा बसल्याने उष्माघाताने साई याला त्रास होऊन मृत्यूचा सामना करावा लागला आहे. साई याच्यावर रविवारी तांभेरे येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत साईच्या पश्चात आई व वडील असा परिवार आहे.

## गणपत हिरे यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील चितळी डिस्टलरी येथील माजी फायरमन गणपत रुंजाजी हिरे (वय ७०) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, एक मुलगा, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

एचडीएफसी बँकेचे सिनिअर सेल्स एक्झिक्युटिव्ह श्रीगीत हिरे यांचे वडील, राजेंद्र हिरे यांचे थोरले बंधू, किरण हिरे यांचे चुलते होत.

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी घेतले विशाल गणपतीचे दर्शन

महाविकास आघाडीचे नगर लोकसभेचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ खासदार डॉ. अमोल कोल्हे नगर येथे आले असता त्यांनी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे जाऊन दर्शन घेतले. यावेळी निलेश लंके, आमदार बाळासाहेब थोरात, माजी आमदार सुधीर तांबे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर, संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसौंदर, दत्ता जाधव, माजी महापौर अभिषेक कळमकर, जयंत वाघ, किरण काळे.

# निंबळक रेल्वे गेट मधील रुळ बदलण्याचे काम सुरु

निंबळक – नगर तालुक्यातील नगर–मनमाड रेल्वेमार्गावरील निंबळक येथील रेल्वे गेट क्रमांक ३० हे ६ मे रोजी सकाळी ९ वाजेपासून ते ८ सायंकाळी सहा वाजेपर्यंत रुळ बदलण्याच्या कामासाठी बंद असून या ठिकाणी दोन दिवसांपासून हे काम अतिशय वेगात केले जात आहे. यापुर्वीही १० ते १५ जानेवारी दरम्यान सहा दिवस येथे दुहेरी मार्ग करण्याच्या कामानिमित्त सदरचे गेट बंद होते. या कामामुळे निंबळक, इसळक, खारेकर्जूने येथील जाणाऱ्या–येणाऱ्या प्रवाशांना, कामगारांना नागरिकांना, दुग्धव्यवसायीकांना रेल्वे मार्गाच्या कडेने पत्री पुलाच्या खालून जाऊन नगर बायपासचा वापर करून एमआयडीसीत तसेच नगर– मनमाड हायवेकडे मार्गक्रमण करावे लागत आहे. हा मार्ग अतिशय खराब आहे परंतू नाईलाजास्तव या मार्गाने लोकांना आपला जिव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या या कामांमुळे येथे कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी उड्डाणपूल करण्याची मागणी निंबळक, इसळक, खारेकर्जुने मधील नागरिकांची आहे.

# अंशतः अनुदानित शिक्षकांना मेडिक्लेम सुविधा लागू करावी

जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे

नगर – महाराष्ट्रातील हजारो शाळेतील अंशतः अनुदानित शिक्षकांना मेडिक्लेम सुविधेचा लाभ मिळावा यासाठी स्वाभिमानी शिक्षक संघटनेच्या वतीने शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांना निवेदन दिले आहे. जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे की महाराष्ट्रात हजारो अंशतः अनुदानित शिक्षक बांधव अध्यापनाचे कार्य करत आहे. सदर शिक्षकांना पगाराशिवाय कुठलाही आधार नाही, पगार देखील हा टप्प्यांमध्ये आहे. सदर शिक्षक किंवा कुटुंबातील एखादा व्यक्ती आजारी पडला तर दवाखान्याचे बिल भरण्यासाठी देखील तिच्याकडे पैसे नसतात. नाईलाजाने सदर शिक्षकाला व्याजाने पैसे घ्यावे लागतात. आणि उपचार पूर्ण करावा लागतो ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. सदर शिक्षकांना मेडिक्लेम सुविधा मिळाली तर त्यांना नक्कीच फायदा मिळेल महाराष्ट्रातील हजारो अंशतः अनुदानित शिक्षकांना या योजनेचा लाभ मिळाला तर शिक्षक सन्मानाचे जिवन जगू शकेल असे शिंदे यांनी म्हटले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### बहुपयोगी नारळ

सौंदर्याच्या दृष्टीकोनातून नारळाचे तेल फार उपयुक्त आहे. नारळाचा खोवलेला कीस, नारळाचे पाणी, दुध, तेल इतकेच काय तर नारळाची कवटी सुद्धा सौंदर्यवृद्धीसाठी फार महत्त्वाची आहे. नारळामध्ये विविध प्रकारचे एन्झाइम्स असतात. यात प्रामुख्याने इन्व्हेस्टीन, ऑक्सिडेज् आणि उटॅलेज यांचा समावेश असतो. तसेच ओल्या नारळात तेल, प्रथिने आणि इतर इनोग्यानिक तत्व असतात. नारळाच्या पाण्याची एक अत्यंत महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे स्त्री गर्भार राहिल्या नंतर आठवड्यातून दोन-तीन वेळा नारळाचे पाणी नियमित पिल्यास बाळाची कांती सुधारते आणि बाळाचा रंग उजळतो, ओले आणि सुके खोबरे शांती देणारे, कामशक्ती वाढवणारे, पोट साफ होण्यास मदत करणारे, तसेच बद्धकोष्ठाचा नाश हि होतो. त्वचेचे आरोग्य त्यामुळे सुधारते.

## पाककला

### आलू दम दहीवडा

**साहित्य** - २५० ग्रॅम छोटे गोल बटाटे, अर्धा पेला कांदा, आले-लसूण पेस्ट, २-३ मिरच्या, २-३ तमालपत्र, एक छोटा तुकडा दालचिनी, २ मसाल्याचे वेलदोडे, एक छोटा चमचा धने, अर्धा छोटा चमचा साखर, सव्वा छोटा चमचा हळद, सव्वा छोटा चमचा मीठ.

**दहीवड्यासाठी साहित्य** : एक पेला उडीदडाळ, एक मोठा चमचा आले व हिरव्या मिरचीचे वाटण, चिमूटभर हिंग, चिमूटभर जिरे, सव्वा छोटा चमचा मीठ, तळण्यासाठी तेल, एक मोठा चमचा बारीक चिरलेली कोथिंबीर, दोन पेले घुसळलेले दही, भाजकी जिरेपूड, कोथिंबीर, हिरव्या मिरच्या, शेव.

**कृति** - मिठाच्या पाण्यात बटाटे उकडून थंड करून सोलून काट्याने टोचून ठेवा. तेल तापवा. त्यात लाल मिरच्या, तमालपत्र, वेलदोडे, जिरे, दालचिनी, धने टाकून फोडणी तयार करा. त्याच तेलात कांदा टाकून गुलाबी होईपर्यंत परता. साखर, मीठ, हळद टाकून परता. बटाटे ते मिश्रण व्यवस्थित परता. दीड-दोन पेले पाणी टाकून दाट होईपर्यंत शिजवा.

दहीवड्यासाठी रात्री डाळ भिजत घाला. सकाळी त्यात हिंग, मीठ, हिरव्या मिरच्या, आल्याची पेस्ट टाकून वाटून घ्या. तेल तापवून गोल वडे बनवून तळून पाण्यात भिजवा. हाताने दाबून पाणी काढा व बाजूला ठेवा. अर्धा लहान चमचा तेल गरम करून त्यात जिरे टाकून तडकवा व त्याची दह्याला फोडणी द्या. वडे दह्यात टाका.

## सौंदर्य

### मुलायम केसांसाठी

* चार लहान चमके खोबरेल तेलात कापराच्या दोन वड्या मिसळा, हे मिश्रण रात्री केसांना लावून ठेवा व सकाळी शाम्पूने धुवा. केस स्वच्छ, मुलायम व कोंडाविरहित होतील.

* मधात तुळस वाटून मिसळून चेहऱ्याला लावल्यास मुरमे व डाग दूर होतात. हे एक फेअरनेस क्रिमचे काम करते.

## वास्तू

बेडरूममध्ये जोडप्यातील कुणा एकाचा स्वतंत्र फोटो लावणे कटाक्षाने टाळा. त्यामुळे अशा जोडप्यादरम्यान मतभेद, कलह, कटुता निर्माण होते, अशी धारणा आहे.

## सल्ला

बटाटा उकडलेले पाणी फेकून न देता ते सिंक साफ करण्यास वापरले ते सिंक एकदम चकाचक होते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

**बुधवार, दि. ८ मे २०२४**

गुरू पश्चिम लोप, शके १९४६ क्रोधीनाम संवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, भरणी १३।३४

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य-**

**मेष** : वैवाहिक जीवनात स्थिती अनुकूल राहील. अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल. शत्रू पराभूत होतील. सावधगिरी बाळगा.

**वृषभ** : अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. मोठ्यांचा आधार मिळाल्याने कार्य पूर्ण होतील.

**मिथुन** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. मातृपक्षाकडून सहयोग मिळेल. व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**कर्क** : मित्रांची मदत मिळेल. आरोग्याची काळजी बाळगणे आवश्यक राहील. व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. कोणत्याही प्रकारचे जोखिम टाळा.

**सिंह** : घरात किंवा पैशांमध्ये वाढ झाल्याने आपणास आनंद मिळेल. आपला निष्काळजी दृष्टीकोन चांगला ठरणार नाही.

**कन्या** : व्यापारात आपणास कमी प्राप्ती होईल पण नुकसान मोठे होईल. जर आपणास एका कार्यात अवनती होईल.

**तूळ** : आपल्या आत्मविश्वासाचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न करा. धार्मिक भावना वाढेल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल सहकार्यांबरोबर प्रतिष्ठा वाढेल.

**वृश्चिक** : अधिक श्रम करावे लागतील. व्यापार-व्यवसाय व आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगावी लागेल. भविष्यात मान-सन्मानात वाढ होईल.

**धनु** : शत्रू पक्षापासून सावध राहा. आनंदाची बातमी मिळेल. सौंदर्यावर धन व्यय होईल. मनोरंजनाच्या विषयांमध्ये वेळ खर्च होईल.

**मकर** : पत्नीपासून सुख मिळेल. सामाजिक क्षेत्रांमध्ये अजून काही विशेष कार्ये होणार नाही. अनुकूल स्थिती मिळेल.

**कुंभ** : एखादी व्यक्ती निष्कारण आपल्याला त्रास देईल. गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल.

**मीन** : व्यवसायासाठी उत्तम वेळ. नवीन कामात यश मिळेल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. शत्रू प्रभावहीन पडतील. आरोग्य उत्तम राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## शब्दगंध क्र. ६९१८

सौ. शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ६९१७ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| म | हि | ना | ■ | दु | रा | पा | स्त |
| रा | म | र | ही | म | ■ | ल | व |
| ठा | ■ | द | र | ड | ■ | व | न |
| से | ना | ■ | रां | ■ | को | ■ | ■ |
| वा | ■ | ■ | झा | क | ली | मू | ठ |
| सं | स | द | ■ | पा | त | ■ | प |
| घ | र | ■ | पा | ळ | ■ | मो | का |
| ■ | की | र्त | न | ■ | दे | ह | ■ |

**आडवे शब्द :-** १) एक म्हण ++++ ++ बोलाचाच भात ६) एक उच्च प्रतीचे लाकूड व त्याचे झाड ८) मुस्लीम वर्षाचा सातवा महिना १०) एक अधिक पाव ११) कृष्णाची प्रेमिका १३) मुस्लीम धर्मपंडित; मुल्ला १४) मारल्याची शरीरावरील खूण; लांबट उठाणू १५) आयात होणाऱ्या मालावरील कर १६) धागा; तंतू १७) सहा ऋतूंपैकी एक १९) हेतू; योजना २०) मुस्लिमांचे एक प्रार्थनास्थळ २२) नाकात घालावयाचा स्त्रियांचा एक दागिना २३) श्रम; परिश्रम; मेहनत २४) पोळी, भाकरी वगैरे ज्यावर भाजतात ते धातूचे गोलाकार उथळ पसरट पात्र

**उभे शब्द :-** १) पांगापांग; तीनतेरा; वाताहत २) हत्तीचे ओरडणे ३) खाटीक; कसाई ४) रास; चळत; चवड ५) पायात चप्पल वगैरे न घालता ७) निकाल; फडशा; उत्पन्नाचा हिशोब ९) कथील व शिसे यांचा मिश्र धातू १२) धावणारा; रनर १३) मजुरांवर देखरेख करणारा १५) ज्याअर्थी; 'तर'चा जोडीदार १६) विष्णूचा पाचवा अवतार १७) शंभराचा समूह १८) भाद्रपद महिना २१) थंड

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : शरीर परोपकारी लावावे । बहुतांच्या कार्यास यावे । उणे पडो नेदावे । कोणि एकाचे - **समर्थ रामदास.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### थंडीच्या दिवसांत आपण का कुडकुडतो?

थंडीचे दिवस, सकाळची शाळा, अशावेळेस उठणे जीवावर येते. नाईलाजाने उठून कुडकुडत आपण शाळेत जातो. थंडी असल्यावरच का कुडकुडतो? उन्हाळ्यात का नाही?

कुडकुडणे ही आपल्या शरीराची थंडीपासून संरक्षण करण्यासाठीची क्रिया आहे. आपण कुडकुडतो म्हणजे आपले स्नायू थरथरत असतात. आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित राखणे आवश्यक असते. फार उष्णता वा फार थंडी यामुळे शरीरातील अवयवांना हानी पोहोचू शकते. यामुळेच बेडकासारखे थंड रक्ताचे प्राणी अशा काळात हायबरनेशनमध्ये जातात व स्वतःला खोल पुरून घेतात. या थंड रक्ताच्या प्राण्यांना शरीराच्या तापमानाचे नियंत्रण करता येत नाही, म्हणून ते असे करतात; परंतु मानव हा गरम रक्ताचा प्राणी आहे. शरीराच्या तापमानाचे नियंत्रण वातावरणातील बदलाप्रमाणे तो करू शकतो. त्यामुळेच उष्णता वाढली की घाम येऊन व थंडी वाढली की कुडकुडण्याच्या क्रियेने शरीराचे संरक्षण केले जाते.

कुडकुडणे म्हणजे स्नायूच्या थरथरण्याच्या हालचालीने स्नायूंतून उर्जा निर्माण केली जाते व तापमान नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला जातो. काही वेळा तापातही व्यक्तीचे हातपाय थडथड उडतात. हिवतापामध्ये रोगजंतूमुळे मेंदूच्या तापमान नियंत्रण केंद्राचे कार्य बिघडते. याचा परिणाम म्हणून ताप असतानाही कुडकुडण्याच्या क्रियेतून शरीरातील उष्णता वाढवण्याचा प्रयत्न केला जातो!

## ससा आणि गरूड

एका बिळात ससा आणि त्याची पिल्ले आनंदाने राहत होती. एकदा ती पिले बिळाबाहेर येऊन खेळत असता एका गरूडाने झडप घालून ती सर्व पकडून नेली. आणि झाडावर असलेल्या आपल्या पिलांना खायला दिली. ते पाहून सशीण गरूडाकडे जाऊन त्याची विनवणी करीत म्हणाली,

''गरूडदादा, सोडून दे रे माझ्या पिल्लांना! तुमच्यासारख्या बलवान लोकांनी आम्हा गरिबावर दया करावी, यालाच माणुसकी म्हणतात.'' पण गरूडाने तिचे काही एक न ऐकता तिची पिले आपल्या पिल्लांना खाऊ घातली.

बिचारी सशीण दुःखाने रडत घरी आली. आपल्या सर्व भाऊबंदांना तिने गोळा केले आणि आपले दुःख उघड केले. तेव्हा सर्वांनाच त्या गरूडाचा फारच राग आला. त्याला चांगली अद्दल घडावी, असे सर्वानुमते ठरताच ते सर्वजण गरूड राहत असलेल्या झाडाच्या बुंध्याजवळ आले. तेथील सर्व माती उकरून त्यांनी झाडाची मुळे उघडी पाडली. वारा थोडा जोराने वाहू लागताच ते झाड जमिनीवर कोसळले. त्यासरशी गरुडाचे घरटे जमिनीवर आदळून त्यातील गरूडाची पिले मृत्युमुखी पडली.

तात्पर्य : दीन-दुबळ्यांना कधी कमी लेखू नये.

## जीवन चक्र

जैसे कि आगे कथा है राजा पीपा ने अपना राज-पाट छोड़ दिया और वे फिर से संत रामानन्द जी के पास पहुँचे संत रामानन्द जी ने उन्हें कहा कि आप इस कुएं में छलांग लगा दो। संत रामानन्द जी देखना चाहते थे कि कितनी दृढ़ता से वे प्रभु को पाना चाहते हैं। राजा पीपा कुएं के पास गए और छलांग लगाने लगे. तो कुछ शिष्यों ने उन्हें पकड़ लिया और यही बताया जाता है कि उसके बाद इनकी तरक्की रूहानियत के रास्ते पर होने लगी। इस शब्द में राजा पीपा अपनी जिंदगी के अनुभवों की बातचीत कर रहे हैं। वे हमें यही समझा रहे हैं कि जिस प्रकार बिजली की शक्ति है, यदि बिजली न हो तो लाउडस्पीकर काम नहीं करेंगे, बिजली नहीं होगी तो हमारे घरों में भी रोशनी नहीं होगी। इसी प्रकार हमारे शरीर के पीछे कोई सत्ता काम कर रही है. वह सत्ता जो किसी बिजली-घर से आ रही है। वह बिजली-घर क्या है? वह परमात्मा है, कर्तापुरुख है जिसने सारी सृष्टि को रचा है।

इस सत्ता का इस शरीर से क्या संबंध है, उसके बारे में राजा पीपा जी हमें यहाँ समझा रहे हैं कि हमारा शरीर एक ऐसा स्थान है जहाँ प्रभु खुद-ब-खुद बसता है। जब हम महापुरुषों की वाणियों को पढ़ते हैं, तो बार-बार हमें यही समझाया जाता है कि इस सृष्टि को चलानेवाला एक ही परमात्मा है। उसे हज़ारों नामों से पुकारा जा सकता है, लेकिन हर एक चीज़ उसके हुक्म से होती है, उसकी मौज से होती है। बहुत सी जगहों पर प्रभु को बाज़ीगर के नाम से भी पुकारा जाता है। बाज़ीगर क्या करता है ? वह जादू करता है और जादू ऐसा करता है कि हमें कुछ मालूम नहीं होता कि कैसे हो गया, हमें दिखाई नहीं देता, लेकिन असल में कुछ और हुआ होता है।

बहुत से धर्मग्रंथों में प्रभु का वह रूप बताया गया है कि प्रभु ने जादू किया हुआ है, एक खेल खेला हुआ है। घरों में जादूगर डुगडुगी लेकर आते हैं और हम उसके खेल में मस्त हो जाते हैं। जादूगर ने एक ऐसा खेल खेला है कि जिस दुनिया में हम जीते हैं, वह हमें एक असल की दुनिया दिखाई देती है और इसी दुनिया की रौनक़ में हम लगे रहते हैं।

सभी महापुरुषों ने बार-बार हमें यही समझाया है कि यह दुनिया माया की दुनिया है, जड़ता की दुनिया है, असल की दुनिया नहीं है। आज के वैज्ञानिक भी हमें यही बता रहे हैं कि जिसे हम ठोस समझते हैं, वह ठोस नहीं है।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

सेवन करने से खाने वालों के मन में भी एक दूसरे के प्रति प्रेम भावना बढ़ती है। जो किसान अकेले आधुनिक यंत्रों द्वारा खेती करते हैं, जिनमें प्रेम भाव नहीं है, जो केवल पैसा कमाने हेतु खेती करते हैं, वह अनाज खाने से खाने वालों के मन में भी प्रेम भावना कम हो जाती

मसारो इमोटो नाम के वैज्ञानिक ने भी एक ग्लास में पानी भरकर उसके प्रति प्यार भरा संकल्प किया आई 'लव यू' (मैं तुमसे प्यार करता हूँ) तो वो पानी क्रिस्टल डायमण्ड जैसे चमकने लगा। दूसरे ग्लास में पानी भरकर संकल्प किया 'आई हेट यू' (मैं तुमसे घृणा करता हूँ) तो उस पानी के क्रिस्टल काले हो गये। इससे यह सिद्ध होता है कि प्रकृति के तत्व (आकाश, वायु, अग्नि, जल और पृथ्वी) भी प्रेम भावना को समझते हैं, भावनाओं का असर प्रकृति पर होता है।

यह सारी सष्टि ज्ञान पवित्रता. शान्ति प्रेम. आनंद और शक्ति - इस गुणों रूपी सुक्ष्म ऊर्जा के एक जाल में बंधी हुई है. जिसको वैश्विक शक्ति कहते हैं और वैश्विक शक्ति का स्रोत परमपिता परमात्मा हैं। आज वर्तमान मनुष्यों के विकर्मो (मनोविकारों) के कारण इस वैश्विक शक्ति में अवरोध आ गया है। राजयोग के अभ्यास से इन सूक्ष्म आध्यात्मिक शक्तियों से स्वयं को भरपूर करना है और प्रकृति को भी चार्ज करना है। इस भौतिकता की दुनिया में बस इन्हीं सूक्ष्म शक्तियों की कमी है। अब आध्यात्मिक सशक्तिकरण का समय चल रहा है। आध्यात्मिक शक्तियों द्वारा भौतिकता को उपयोग में लाना है। वर्तमान समय मनोविकारों के कारण पूरे विश्व में दु:ख, अशान्ति, भय बढ़ता जा रहा है। परमपिता परमात्मा अपने ब्रह्मा वत्सों द्वारा सत्य ज्ञान विश्व की सर्व आत्माओं तक पहुँचाने की सेवा कर रहे हैं जिससे हम दुःखदाई भवसागर से मुक्त हो सकें। अब हमें सुना-अनसुना कर कुम्भकर्ण (अज्ञान, भ्रम) की निद्रा में नहीं रहता है। अभी सृष्टि की अन्तिम श्वांसें चल रही हैं। इतनी तमोप्रधानता बढ़ गई है जो कभी भी कुछ भी हो सकता है। इससे स्वयं को बचाने के लिये अब मनमत, परमत छोड़ ईश्वरीय मत पर चलना आवश्यक है।

**ईश्वरीय मत कहती है, पहले अपने जीवन रूपी खेती में ज्ञान का हल चलाओ। शुद्ध संकल्प रूपी बीज की बुआई करो। अपने ही पवित्र तन, मन, धन की खाद का उपयोग करो।**

रोज़ सत्संग रूपी जल ग्रहण करो। रोज़ ज्ञान सूर्य परमात्मा की दिव्य शक्तियों की लाइट से आत्मा को शक्तिशाली बनाओ अवगुण और बुराइयों रूपी घास (खरपतवार) को निकालते जाओ। शुभ भावना, शुभ कामना की दवाई अपने प्रति, विश्व के प्रति छिड़कते रहो। पर दिव्य गुण और दैवी संस्कार रूपी फसल को प्राप्त करो। जब हम खुद अपने जीवन को दिव्य गुण, दैवी संस्कारों से सुशोभित करते हैं तभी खेती में भी पौष्टिक और सात्विक अनाज का निर्माण कर सकते हैं। कहते हैं जो करेगा सो पायेगा, जितना करेगा उतना पायेगा, जैसा करेगा वैसा ही मिलेगा...। परमपिता परमात्मा कहते हैं, अब नहीं तो कब नहीं। वनस्पतियों के जादूगर ल्यूथर बरबैक ने प्रयोग द्वारा केकतास (निवडूंग) की वनस्पति को अर्जी डाली कि वे अपने कांटे निकाल लेवें।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक** - हॉटेलमध्ये ठेवलेली झाडे वाढत का नाही?

**चिंटू** - कारण तिकडे वाढायला वेटर्स असतात ना...

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



सकाळच्या ह्या प्रकाशात
माझे हृदय
कशाची कामना करतय
हेच मला उमगत नाही

मूळ इंग्रजी कविता - **रविंद्रनाथ टागोर**
मराठी अनुवाद - **अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

आयुष्यभर साथ देणारा माझा भावी जोडीदार कसा असेल? तो माझ्या भावना समजून घेईल का? आमच्या दोघांचे विचार जुळतील का? माझं लग्न ठरेल का? नक्कीच मला लग्न करायचे आहे का? लग्नाचा भरभक्कम पाया असणारे शारीरिक संबंध मला जमतील का? शारीरिक संबंध म्हणजे काय? पत्रिका बघून गुण जुळत असेल तर लग्न करावे की त्याबरोबरच डॉक्टरांकडून तपासणी करुन घ्यावी? आई-बाबा म्हणतील त्या की मला आवडणाऱ्या मुलाशी लग्न करावे? असे अनेक प्रश्न सध्याच्या विवाहेच्छुक मुलींच्या मनात येतात. खरोखरच या प्रश्नांची उत्तरे कुठे मिळणार? तर याकरिताच गरज आहे ती विवाहपूर्व समुपदेशनाची.

एकदा लग्न करायचय हे मनाशी पक्क झालं, की आंधळेपणाने पुढे न जाता विचार आणि नियोजन करुन त्यावर पाऊल टाकले पाहिजे. पूर्वी नात्यामध्ये किंवा ओळखीमध्ये लग्न ठरायची. त्यामुळे घराण्याचा इतिहास, मुलाचा स्वभाव व आरोग्याविषयी माहिती मिळणे शक्य असे. आजच्या काळात लग्न जमवण्याच्या पद्धतीत बराच फरक पडला आहे. विवाहमंडळे, वृत्तपत्रीय जाहिराती, जातींचे वधूवर मेळावे, इंटरनेट असे विविध पर्याय उपलब्ध आहेत. जुन्या पद्धतींत किंवा आजच्या काळातील पद्धतींमध्येही वैद्यकीय समुपदेशनाची गरज असते. त्यामुळे पुढील आयुष्यात निर्माण होणारे धोके समजतात व त्यावर वेळीच उपाय करता येईल किंवा न येईल याबद्दलचे मार्गदर्शन डॉक्टरांकडून मिळते. अर्थातच फसवणूक थांबवता येऊ शकते. विवाहापूर्वी वधू आणि वर या दोघांच्याही वैद्यकीय तपासण्या करून घेणं आजच्या काळाची गरज आहे.

प्रत्येक विवाहेच्छुक मुलीच्या मनामध्ये पतीबद्दलची प्रतिमा बनलेली असते. ती स्वप्नामध्ये भावी पतीबद्दल विचारही करते. त्यात चुकीचे काहीच नाही. परंतु स्वप्न सत्यात उतरणे फार कठीण असते. त्यामुळे स्वप्न आणि प्रत्यक्ष जीवन यांचा ताळमेळ बसवणे जमले पाहिजे. याकरिता घरातील मोठ्या स्त्रियांनी स्वप्नातला राजकुमार व प्रत्यक्ष जोडीदार व इतर जबाबदाऱ्या यांची जाणीव करून द्यायला हवी. त्यामुळे आज वैवाहिक जीवनात निर्माण झालेली विफलता, नैराश्य आणि भांडणांचे प्रमाण कमी होईल.

विवाह नातेसंबंधांमध्ये करू नये. बऱ्याच घराण्यांमध्ये आपली संपत्ती दुसऱ्या घरातील स्त्रीला मिळू नये, म्हणून पिढ्यान्पिढ्या आपल्याच नात्यातील मुलीला सून करतात. परंतु यामुळे होणाऱ्या अपत्यांमध्ये जन्मतःच व्यंग असू शकते. शारीरिक व्यंग नसले तरी मतिमंद किंवा बुद्धिक्षमता कमी असलेले अपत्य जन्माला येऊ शकते. उदाहरणार्थ, सलग तीन-चार पिढ्या प्रत्येक पिढीत मामाची मुलगी पत्नी म्हणून केली तर पुढच्या पिढीत शारीरिक किंवा मानसिक विकृती निर्माण होऊ शकते. आपल्या आजुबाजूला अशी अनेक उदाहरणे असतात.

(क्रमशः)

**- डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# ‘बालरंगभूमी परिषद’ अहमदनगर शाखेचे कार्य उल्लेखनीय

### अभिनेत्री निलम शिर्के–सामंत

बालरंगभूमी परिषद, अहमदनगर शाखेच्या ‘हसत खेळत बालनाट्य शिबिरा’प्रसंगी सिने व नाट्य अभिनेत्री निलम शिर्के–सामंत. समवेत डॉ. दीपा क्षीरसागर, सतीश लोटके, मोहनीराज गटचे अमित बैचे आदी.

नगर – ‘बालरंगभूमी परिषद’ अहमदनगर शाखेचे कार्य उल्लेखनीय, असे प्रतिपादन अभिनेत्री निलम शिर्के–सामंत यांनी केले

बालरंगभूमी परिषद अहमदनगर जिल्हा शाखा आयोजित ‘हसत खेळत बालनाट्य शिबीर’ ५ मे पर्यंत माऊली सभागृह अहमदनगर येथे पार पाडले. त्याचा समारोप कार्यक्रम ५ मे रोजी पार पडला. या कार्यक्रमास बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या अध्यक्ष सिनेनाट्य अभिनेत्री निलम शिर्के–सामंत, उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, अभिनेते मोहिनीराज गटणे, अमित बैचे, पुणे जिल्हाध्यक्ष दिपाली शेळके, नंदकुमार जुवेकर, अरूण पटवर्धन, अनंत जोशी उपस्थित होते.

या वर्षी शिबिरात १०९ बाल कलाकार सहभागी झाले होते. त्यांना प्रा.डॉ. सय्यद अमजत, सतीश लोटके, शैलेश देशमुख, देवीप्रसाद सोहोनी, सागर अलचेट्टी यांनी प्रशिक्षण दिले. सहभागी कलाकारांनी सादर केलेल्या नाट्य छटा, एकांकिका, नृत्य, सूत्रसंचालनाने उपस्थितांची वाहवा मिळवली.

यावेळी सिने–नाट्य अभिनेत्री, बालरंगभूमी परिषद मुंबईच्या अध्यक्षा निलम शिर्के– सामंत यांनी बालरंगभूमी परिषदेच्या अंतर्गत भविष्यात राबविण्यात येणाऱ्या अनेक नवीन उपक्रमांची माहिती दिली. ज्यामध्ये बालनाट्य स्पर्धा किंवा बालरंगभूमीवर तांत्रिक बाजू सांभाळण्यासाठी बाल कलावंतांना सक्षम करण्याच्या हेतूने अभिनयासोबतच बाल कलावंतांना रंगभूषा, वेशभूषा, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, दिग्दर्शन याचेही प्रशिक्षण देण्यात येईल तसेच बालरंगभूमी परिषद केवळ नाट्यकलेपुरतीच मर्यादित न राहता इतर ललित कला प्रकारांचा समावेश त्यामध्ये व्हावा, या हेतूने भविष्यात बालरंगभूमी परिषदेचे कार्य राहील असेही त्या म्हणाल्या.

बालरंगभूमी परिषद मध्यवर्तीच्या उपाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर यांनी सर्व कार्यकारिणी सदस्यांचे शिबीर आयोजन केल्याबद्दल अभिनंदन करत आपले मनोगत व्यक्त केले.

मुंबईचे प्रमुख कार्यवाह सतीश लोटके यांनी भविष्यात विविध पारितोषिक विजेत्या तसेच उत्कृष्ट अशा बालनाट्य संहिता एकत्रित करून त्या निशुल्क सर्वांना उपलब्ध कशा करून देता येतील या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील, तसेच बालरंगभूमीसाठी सातत्याने बालनाट्य चळवळ राबविणाऱ्या किंवा बालरंगभूमीवर कार्यरत असणाऱ्या होतकरू कलावंतांचा, ज्येष्ठांचा सन्मान बालरंगभूमी परिषदेतर्फे करण्याची योजना असल्याचे सांगितले.

समारोप प्रसंगी सिनेनाट्य अभिनेते मोहिनीराज गटणे, सिने नाट्य लेखक दिग्दर्शक अमित बैचे, कार्यकारी मंडळ सदस्य अनंत जोशी, नगर बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सौ.उर्मिला लोटके यांच्यासह नगरकर नाट्य रसिक उपस्थित होते.

तसेच शिबीराचा समारोप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिबीर प्रमुख तेजा पाठक, सोनाली दरेकर, विराज अडगटला, प्रमुख कार्यवाह प्रसाद भणगे, कार्याध्यक्ष देवीप्रसाद सोहनी, उपाध्यक्ष शैलेश देशमुख, सुजाता पायमोडे, कोषाध्यक्ष टिना इंगळे, श्रेया देशमुख, सपना साळुंके, सागर अलचेट्टी, तेजस अतितकर, भाग्यश्री दातखिळे, प्रशांत सूर्यवंशी, ऋतुजा पाठक, अविनाश बोधले, मैथिली जोशी आदींनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन तेजा पाठक यांनी केले तर आभार प्रमुख कार्यवाह प्रसाद भणगे यांनी मानले.

श्री संत सेना महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना आ. संग्राम जगताप. समवेत मोहन फुलडहाळे, रमेश बनभेरू, बाबुलाल ईणानिया, संजय टाक, नंदकिशोर टाक, मनिष फुलडहाळे आदी.

# शहरात श्री संत सेन महाराजांची जयंती साजरी

नगर – शहरातील सेन समाजाच्या वतीने श्री संत शिरोमणी सेन महाराजांची ७२४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. श्री संत सेन यांच्या पादुकेचे पुजन करून पालखीतून मिरवणुक काढण्यात आली.

नवीन टिळक रोड, माऊली सांस्कृतिक हॉल मध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या प्रारंभी आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते श्री संत सेन महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मोहन फुलडाळे, रमेश बनबेरु, बाबुलाल ईणानिया, संजय टाक, नंदकिशोर टाक, मनिष फुलडहाळे, अरुण खिची, मनोज फुलडहाळे, विशाल फुलडहाळे, वैभव ढाकणे, योगेश फुलडहाळे आदी उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, संत सेन महाराजांनी भक्तीचा मार्ग दाखविला. जीवनाचे सार्थक होण्यासाठी संत सेन महाराजांनी दाखवलेला भक्ती मार्ग स्विकारण्याची गरज आहे. संतांना प्रदेश, भाषा, जातपात यांच्या मर्यादा नसून, त्यांचे कार्य अखंड मानव जातीसाठी आहे. उच्च विचारसरणी व पंढरीनाथावर निष्ठा असणारे संत सेन महाराजांचे विचार समाजाला दिशा देणारे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

श्री संत सेन महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सेन समाज बांधव सहभागी झाले होते.

# आनंदधाम येथे ९ व १० मे रोजी दोनदिवसीय कार्यक्रमांचे आयोजन

नगर – आचार्यश्रींची पवित्र पावन भूमी आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म.सा., प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषिजी म. सा., जिन शासन प्रभावक श्री सौरभमुनिजी म. सा. आदि संतवृंद व सेवाभावी श्री सत्यप्रभाजी म., श्री त्रिशलाकंवरजी म.,श्री पुष्पकवरजी म., महाराष्ट्र प्रवर्तिनी श्री प्रतिभाकवरजी म., उपप्रवर्तनी श्री मंगलप्रभाजी म., श्री दिव्य दर्शनजी, श्री विश्वदर्शनजी म., श्री विचक्षणजी म, श्री पुष्पचूलाजी म, श्री आराधनाजी म, श्री मंगल प्रभाजी म आदि ठाणा यांच्या सान्निध्यात ९ व १० मे रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

९ मे रोजी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा.यांचा ६३ वा दिक्षा दिन कार्यक्रम होणार आहे. सकाळी ८.३० ते १० यावेळेत दिक्षा दिन कार्यक्रम होणार आहे. याचदिवशी सायंकाळी ७ ते ८.३० यावेळेत वर्षीतप तपस्वींचा भावा कार्यक्रम होईल, अशी माहिती श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न धार्मिक परीक्षा बोर्डच्यावतीने देण्यात आली.

१० मे रोजी अक्षय तृतीयेला सकाळी ८.३० ते १० यावेळत कार्यक्रम होणार आहे. वर्षीतप पारणा महोत्सव, महाराष्ट्र प्रवर्तिनी प्रतिभाकंवरजी म.सा.यांचा प्रवर्तिनी पदालंकरण चादर समारोह, श्रमण संघ स्थापना दिन महोत्सव साजरा होणार आहे. सकाळी १० नंतर वर्षीतप तपस्वींचा पारणा सुरु होईल. केशरगुलाब मंगल कार्यालयात पारणा कार्यक्रम होईल. या सर्व कार्यक्रमांना श्रावक – श्राविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री तिलोकरत्न धार्मिक परीक्षा बोर्ड यांच्यावतीने करण्यात आले आहे. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी गौतम प्रसादीची व्यवस्था करण्यात आली आहे.

# ‘नमोह असोसिएटस्’च्या इको प्लास्ट ब्रॅण्डची उत्पादने बांधकामासाठी उपयुक्त

नगर – नगरमधील नमोह असोसिएटस् कंपनीकडून इको प्लास्ट ब्रॅण्डच्या नावाने बांधकामासाठी उपयुक्त दर्जेदार उत्पादनांची निर्मिती केली जाते. नदीच्या वाळूपासून सदर उत्पादने तयार केली जातात. यामुळे बांधकामाचा दर्जा, आयुष्य वाढण्यास मदत होते. इंटेरियर डिझायनर असोसिएशन व इको प्लास्ट यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात कंपनीने इको प्लास्ट स्कर्टिंग मॉरटर या नवीन उत्पादनाचे लॉंचींग केल्याचे कंपनीच्यावतीने सांगण्यात आले.

### विशेष कार्यक्रमात इको प्लास्टच्या दर्जेदार उत्पादनांचे सादरीकरण

इको प्लास्टच्या दर्जेदार उत्पादनांचे सादरीकरण करण्यात आले.

या कार्यक्रमास इको प्लास्टचे सुयोग चोपडा, आकाश कुमट, विवेक जैन, महावीर हिरण, ललित जैन, इंटेरियर डिझायनर असोसिएशनचे अध्यक्ष सागर कंदूर, उपाध्यक्ष चेतन वाडेकर, सचिव व्रजेश शहा, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ इंटेरियर डिझायनरचे अध्यक्ष अजय अपूर्व, आर्किटेक्ट असोसिएशनचे प्रल्हाद जोशी, उमेश जाजू, विनायक घोसके आर्दीसह इंटेरियर डिझायनर, आर्किटेक्ट उपस्थित होते.

सुयोग चोपडा यांनी सांगितले की, बांधकाम करताना नदीच्या वाळूला खूप महत्व असते. अनेकदा वाळू मिळवताना अडचण येते. हीच गोष्ट लक्षात घेवून इको प्लास्टने नदीच्या वाळूपासून उत्पादने तयार केली आहेत. अनेक ग्राहकांनी त्याचा वापर केला असून, टिकाऊपणा अनुभवला आहे. लाईट वेट ब्लॉक बांधकामसाठी वापरण्यात येतात. नदीच्या वाळूचे प्लास्टर करायचे असेल तर इको प्लास्ट वापरणे उपुयक्त ठरते. टाईल्स लावण्यासाठी उच्च दर्जाचे केमिकल, भिंत व जमीन जॉइंटवर अनेकदा लिकेज होते. तो कमी करण्यासाठी इको प्लास्ट स्कर्टिंग मॉरटर उपयुक्त ठरणार आहे. स्कर्टिंग मॉरटर बनविणारी इको प्लास्ट ही महाराष्ट्रातील पहिली कंपनी आहे.

# समाजकार्यकर्त्यांसाठी विविध क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी

### डॉ. महेश ठाकूर यांचे प्रतिपादन

सीएसआरडी महाविद्यालयात संस्था दिन व निरोप समारंभप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ. महेश ठाकूर. समवेत चंद्रकांत गायकवाड, सुरेश कदम, विकास साळवे, प्रा.डॉ. उषा लोळगे, डॉ. प्रकाश पाटील, डॉ. के.के. कनोजिया, डॉ. सुरेश पठारे.

### सीएसआरडी महाविद्यालयात संस्था दिन व निरोप समारंभ उत्साहात

नगर – सीएसआरडी विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने समाजकार्य शिक्षणाचे मुल्ये देत असते ते करिअरला आकार देणारे असते. सीएसआरडीत मिळालेल्या शिक्षणामुळेच मी आज महाराष्ट्रातील एका समाजकार्य महाविद्यालयाचा संचालक होवू शकलो त्यामुळे माजी विद्यार्थी म्हणून मला सीएसआरडीचा नेहमी अभिमान राहील. सध्याची सामाजिक परिस्थिती बघता समाजात अनेक आव्हाने असून या आव्हानांना हाताळण्यासाठी सीएसआरडीने दिलेली दृष्टी व कौशल्ये विद्यार्थ्यांनी आयुष्यभर लक्षात ठेवली पाहिजे असे मत यावेळी डॉ. महेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद सांधताना व्यक्त केले. सद्या समाजकार्यकर्त्यासाठी विविध क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी आहेत आपण त्यासाठी स्वतःला तयार केले पाहिजे असे मत त्यांनी आवर्जून व्यक्त केले.

बीपीएचई सोसायटीचे सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालयात नुकताच संस्था दिन व निरोप समारंभ झाला. सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास समाजात उल्लेखनीय व प्रभावी कार्य करीत असलेलेया माजी विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने केंद्र शासनाच्या युवा कल्याण मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या नेहरू युवा केंद्रात समन्वयक म्हणून ३२ वर्ष कार्य करून निवृत्त झालेले चंद्रकांत गायकवाड, पुणे येथील कर्वे समाजकार्य महाविद्यालयाचे संचालक डॉ. महेश ठाकूर, अहमदनगर येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात समाजकार्य विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असणारे सुरेश कदम व पुणे येथील कमिन्स इंडिया कंपनीच्या सीएसआरविभागाचे कार्यकारी व्यवस्थापक विकास साळवे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच या माजी विद्यार्थ्यांना घडवीणारे निवृत्त प्राध्यापक डॉ. उषा लोळगे, प्रा. प्रकाश पाटील, प्रा. व्हिक्टर जॉर्ज, डॉ. के.के. कनोजिया यांच्यासह आजी व माजी विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी समाजदर्पण या महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकाचे व प्लेसमेंट ब्रोशरचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

चंद्रकांत गायकवाड यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले कि, योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणे आपल्या आयुष्यात खूप गरजेच असते आणि ते आपल्याला आपल्या शिक्षकांकडून मिळत असतं त्यामुळे शिक्षकांच्या सहवासात राहणे खूप गरजेचे व महत्त्वाचे आहे.

यावेळी सुरेश कदम व विकास साळवे यांचीही भाषणे झाली, त्यांनी आपले अनुभव व्यक्त करत सांगितले कि, आपल्याला मिळालेल्या शिक्षणाचा व्यावसायिक विकासासाठी योग्य उपयोग केला पाहिजे, मिळालेल्या ज्ञान व कौशल्याचा उपयोग एक व्यावसायिक समाजकार्यकर्ता म्हणून घडविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

डॉ.जेमोन वर्घीस यांनी उपस्थितांसमोर संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला. महाविद्यालयात वर्षभरात राबविण्यात आलेल्या प्रमुख उपक्रमांच्या माहिती सोबत वर्षभरातील मुख्य शैक्षणिक उपलब्धींची माहिती दिली. यावेळी वर्षभरात विविध उपक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले तसेच द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना मेडल वितरीत करण्यात आले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. सुरेश पठारे यांनी सांगितले कि, समाजमूल्य व तत्त्वाशी नेहमी कटिबद्ध राहिले पाहिजे. समाजकार्यकर्ता म्हणून समाजातील विविधतेचा आदर करून सामाजिक असमतोल कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी समस्या हाताळणीचे कौशल्य वाढविण्यासाठी अग्रेसर असणे आवश्यक आहे असे आवर्जून सांगितले. यावेळी एमएसडब्ल्यू द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी ट्विंकल ईश्वरी हिचा सन २०२३ – २४ या शैक्षणिक वर्षातील उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून गौरव करण्यात आला. दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विध्यार्थ्यांनी विविध सांकृतिक कार्यक्रम सादर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथम वर्षाचे विद्यार्थी जितेश कांबळे व साक्षी भांगे यांनी केले तर आभार प्रा.विजय संसारे यांनी मानले. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ.जेमोन वर्घीस, प्रदीप जारे, विजय संसारे, आसावरी झपके, वैशाली पठारे, सॅम्युअल वाघमारे, नाजिम बागवान, पौलस वाघमारे, हर्षल आगळे यांच्यासह सीएसआरडी महाविद्यालयाचे कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

अहमदनगर महाविद्यालयाच्या १९६९ –७० सालच्या शास्त्र विभागाच्या प्री डिग्रीच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेट देऊन संस्थेचे संस्थापक भा.पा.हिवाळे यांच्या पुतळ्याजवळील छायाचित्र.

# पंचावन्न वर्षांनी भेटले जुने सवंगडी

### अहमदनगर महाविद्यालयातील शास्त्र विभागाच्या प्री डिग्री वर्गाच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

नगर – पंचावन्न वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहसंमेलनास उपस्थित राहण्याचा क्षण एखाद्याच प्राध्यापकाच्या जीवनात क्वचितच येतो. तो क्षण माझ्या वाट्याला आला. त्यामुळे माझं मन समाधानाने, आनंदाने भरून पावले आहे. अशा भावना प्राध्यापक प्रताप यांनी व्यक्त केल्या. प्रसंग होता १९६९–७० सालच्या शास्त्र विभागाच्या प्री डिग्री वर्षाच्या विद्यार्थ्यांचा ५५ वर्षानंतर झालेल्या स्नेहसंमेलनाचा, ५५ वर्षानंतर पुन्हा भेट झाल्याने या विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. अहमदनगर क्लब येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास पुणे शहर व नगर जिल्ह्यातील ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून रसायन शास्त्राचे तत्कालीन प्राध्यापक प्रताप सर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्नेहसंमेलनास सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी पुणेरी पगडी देऊन प्रताप सरांचा सत्कार केला.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना जुन्या काळातील आठवणींना उजाळा दिला. त्या वेळचे अनुभव कथन करताना अनेक विद्यार्थ्यांच्या भावना दाटून आल्या. यावेळी ७३ वर्षीय माजी विद्यार्थी लेंडे यांनी योगाची प्रात्यक्षिके दाखवून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. सर्व माजी विद्यार्थ्यांनी अहमदनगर महाविद्यालयात जाऊन ५५ वर्षांपूर्वी ज्या वर्गात, ज्या बाकावर बसून शिक्षण घेतले होते त्या वर्गाला भेट दिली. तेथे बाळासाहेब पतंगे आणि श्रीमती जयश्री जगताप यांनी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. स्नेहमेळाव्याचे आयोजन केल्याबद्दल उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी संयोजकांचे आभार मानले.

प्रास्तविक माजी नगरसेवक सतीश लांडगे यांनी करून उपस्थितांचे स्वागत केले. ५५ वर्षांनी सर्व सवंगडी एकत्र केल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र डांगरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन बाळासाहेब पतंगे यांनी केले.

# दगडफेक गुन्ह्यातील आरोपींची निर्दोष मुक्तता

नगर – भुतकरवाडी येथील योगेश भुजबळ यांच्या कटिंग दुकानात झालेली हाणामारी तसेच फिर्यादी यांच्या घरावर केलेल्या दगडफेक घटनेबद्दल फिर्यादी यांनी तोफखाना पो.स्टे. येथे दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपी अमोल अशोक भगत, निकेश अशोक भगत तथा एक महिला या आरोपींविरूद्ध भारतीय दंड संहिता कलम ३३७, ३२३, ५०४, ५०६, २०१, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचा समांतर तपास करून तोफखाना पोलीस स्टेशनचे तपासी अधिकारी यांनी जिल्हा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीतर्फे ॲड. सचिन पाठक यांनी काम पाहिले. या केसचा निकाल नुकताच लागला असून, न्यायालयाने आरोपीची पुराव्याअभावी गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली आहे.

# नगर शहरात रंगला जय तुळजा भवानी महिला बचत गटाचा होम मिनिस्टर कार्यक्रम

नगर – शहरातील झारेकर गल्ली येथे महिलांसाठी होम मिनिस्टरचा कार्यक्रम रंगला होता. विविध स्पर्धेने होम मिनिस्टरच्या कार्यक्रमात महिलांचा उत्साह संचारला होता. जय तुळजा भवानी महिला बचत गटाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

रंगलेला हा खेळ पैठणीच्या कार्यक्रमात विविध स्पर्धेचा सामना करीत महिलांनी मनोरंजनात्मक खेळाचा आनंद लुटला. सर्वधर्मिय महिलांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. सोनाली दुर्गुड यांनी प्रथम क्रमांकाचे पैठणी साडी ५ हजार रुपये रोख बक्षीस पटकाविले. तर रोहिणी आगरकर यांनी द्वितीय क्रमांकाचे सेमी पैठणी ३ रुपये रोख व अंजली मुळे यांनी तृतीय क्रमांकाचे चांदीचे जोडवे २ हजार रुपये रोख बक्षीस मिळवले.

### महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, पैठणीसह महिलांनी पटकाविली विविध बक्षिसे

येथील झारेकर गल्लीतील जय तुळजा भवानी महिला बचत गट आयोजित होम मिनिस्टर स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना सौ. धनश्री विखे पाटील. समवेत बक्षीसपात्र महिला व आयोजक महिला.

विजेत्या महिलांना धनश्री विखे पाटील यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. यावेळी वृषाली लोंढे, शीतल लोंढे, माधुरी लोंढे, ममता शिंदे, बालिका शिंदे, नितू वाणे, प्रमिला बिंगी, संगीता सब्बन, नागमणी संदुपटला, सुनीता घावटे, छाया नरसाळे, सविता कोटा, शितल दगडे, सोनाली अमृते, पुष्पा घावटे, मालन खरमाळे, मीरा खरमाळे, मंदा शिंदे, आशा आगरकर, पवार, शितल दगडे, अरुणा मामड्याल, अनुराधा बिंगी आदींसह महिला उपस्थित होत्या.

धनश्री विखे पाटील म्हणाल्या की, प्रत्येक महिलेमध्ये विविध सुप्त कलागुण असतात. पण संसाराच्या जबाबदाऱ्या पेलविताना तिच्यामध्ये असलेले कलागुण कोमजतात. या कार्यक्रमातून तिच्या कलागुण वाव देण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. तर जय तुळजा भवानी महिला बचत गटाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

माधुरी लोंढे यांनी महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी जय तुळजा भवानी महिला बचत गट कार्य करत आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करुन त्यांच्या कलागुणांना देखाल प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. बचत गटाच्या मुख्य सचिव नीलिमा येनगुपटला यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमात महिलांसाठी विविध खेळाच्या फेऱ्या घेण्यात आल्या. विविध स्पर्धेचे टप्पे पार करुन महिलांनी बक्षिसांची लयलुट केली. १० महिलांना उत्तेजनार्थ बक्षीस म्हणून आकर्षक भेटवस्तू व पाचशे रुपयांचे बक्षीस देण्यात आले.

कार्यक्रम पाहण्यासाठी परिसरातील महिलांनी मोठी गर्दी केली होती.

# मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धीबळ स्पर्धेत ज्येष्ठ खेळाडूंचा सत्कार

Shantikumarji Firodia Memorial Foundation
From : Friday 3rd May to
Tuesday 7th May 2024
Organized by
Ahmednagar District Chess Circle
SHANTIKUMARJI FIRODIA MEMORIAL FOUNDATION

शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फौंडेशन व अहमदनगर जिल्हा बुद्धीबळ संघटनेच्यावतीने मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुल्या क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धीबळ स्पर्धेत ज्येष्ठ खेळाडूंचा सत्कार करताना जि.प.चे अधिकारी रमेश कासार. समवेत यशवंत बापट, इतर पदाधिकारी.

नगर – शांतिकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशन व अहमदनगर जिल्हा बुध्दीबळ संघटनेच्या वतीने आयोजित बडी साजन मंगल कार्यालय येथे सुरु असलेल्या बुद्धिबळ स्पर्धेच्या चौथ्या दिवशी जिल्हा परिषदेचे जि. प. लेखा व वित्त अधिकारी रमेश कासार यांनी भेट देऊन ज्येष्ठ खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

तसेच स्पर्धेच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल अहमदनगर जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे व आयोजकांचे कौतुक करत म्हणाले की, बुध्दीबळ खेळामुळे खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. स्मरणशक्ती वाढते. निर्णय क्षमता प्राप्त होते. तसेच स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत ३६० खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह अनेक राज्यांतील खेळाडूंनी सहभाग घेतला असून हे स्पर्धा ३ ते ७ मे या कालावधीत झाल्या. स्पर्धेत सहभागी झालेल्या २० ज्येष्ठ खेळाडूंचा सत्कार गुलाब पुष्प देऊन करण्यात आला. या अनोख्या उपक्रमाबद्दल उपस्थितांनी अहमदनगर जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे कौतुक केले.

स्पर्धेतील सहभागी ज्येष्ठ खेळाडू ईश्वर रामटेके (नागपूर), बलभीम कांबळे (नगर), गजानन चिपळूणकर (पुणे), सुरेंद्र सरदार (ठाणे), विजय कुलकर्णी (नगर), निवृत्ती इंगळे (बुलढाणा), शरद भाई शुक्ला (गुजरात), लाल गोविंद कोल्पेक (नगर), अशोक राधेवार (अकोला), मिलिंद पार्ले (हरियाणा), गिरीश मुळे (ठाणे), नथू सोमवंशी (जळगाव), दीपक ढेपे (बीड), ओ.पी.तिवारी (मध्य प्रदेश), प्रदीप कुलकर्णी (पुणे), सुरेंद्र चांदोले (पुणे), चंद्रकांत चौधरी (पुणे), सुनील जोशी (नगर) यांचा सत्कार जि.प. लेखा व वित्त अधिकारी रमेश कासार यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी अहमदनगर जिल्हा बुध्दीबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट सर, पारुनाथ ढोकळे सर, पंच प्रविण ठाकरे, प्रकाश गुजराथी, यशवंत पवार, शार्दूल टापसे, खजिनदार सुबोध ठोंबरे, शाम कांबळे, प्रकाश गुजराथी, संजय खडके, देवेंद्र ढोकळे, रोहित आडकर, ओंकार बापट, देवेंद्र वैद्य, दत्ता घाडगे, नवनीत कोठारी, सौ. अनुराधा बापट, सौ. स्मिता वाघ, सौ.रोहिणी आडकर आदी उपस्थित होते.

# लार्ज कॅप फंडच्या माध्यमातून बाजारातील अस्थिरतेवर मात

आदित्य देशपांडे

गेल्या एका वर्षात मिड आणि स्मॉल कॅप शेअरमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचा मोठा ओघ आल्यामुळे त्यांना बातम्यांमध्ये स्थान मिळाले आहे. त्यामुळे सध्या त्यांचे मूल्यांकन दबावाखाली असल्याचे दिसते. अशा वेळेस स्वतःच्या गुंतवणुकीबाबत आपण सावध असले पाहिजे. दीर्घकालीन गुंतवणुकीच्या संदर्भात मूल्यांकनाबाबत सावध असणे हा नेहमीच चांगला दृष्टिकोन ठरतो. या दृष्टीने पाहिले तर बाजारपेठेच्या सध्याच्या स्थितीत मिड आणि स्मॉल कॅपच्या तुलनेत लार्ज कॅप क्षेत्रात वाजवी मूल्यांकन मिळू शकते.

लार्ज कॅपमध्ये गुंतवणूक करण्याचा प्रश्न येतो तेव्हा गुंतवणूकदारांकडे दोन पर्याय असतात–थेट गुंतवणूक किंवा इक्विटी म्युच्युअल फंड.थेट गुंतवणुकीच्या संदर्भात सविस्तर अभ्यास आणि विश्लेषण करण्याची गरज असते, ते आव्हानदायक ठरू शकते. अनेक गुंतवणूकदारांच्या दृष्टीने हे जिकीरीचे आणि वेळखाऊ काम ठरू शकते. याच कारणामुळे लार्ज कॅप केंद्रीत म्युच्युअल फंड हा अधिक चांगला पर्याय ठरू शकतो.

लार्ज कॅप म्युच्युअल फंडच्या माध्यमातून गुंतवणूकदाराला भारतातील सर्वोच्च १०० सूचीबद्ध कंपन्यांपर्यंत पोहोचता येते. या कंपन्यांकडे साधारणपणे प्रचंड मोठे बाजार मूल्यांकन, भरीव आर्थिक स्थितीचा इतिहास, उत्तम कॉर्पोरेट प्रथांशी बांधिलकी असते आणि ज्या क्षेत्रात त्या कार्यरत असतात त्या क्षेत्रातील त्या सामान्यतः अग्रगण्य कंपन्या असतात. याशिवाय आर्थिक मंदीच्या काळात मिड व स्मॉल कॅप कंपन्यांच्या तुलनेत लार्ज कॅप कंपन्या अधिक कणखरपणा दाखवतात. त्यामुळे लार्ज कॅप फंडमध्ये कमी अस्थिरता असते.

लार्ज कॅप कंपन्यांचे स्वरुप पाहता भांडवलात वृद्धी आणि दीर्घकालीन सातत्यपूर्ण, परंतु कमी अस्थिरतेसह, वाढीचे लक्ष्य असलेल्या व्यक्तींसाठी लार्ज कॅप म्युच्युअल फंड सर्वोत्तम ठरतात. अर्थपूर्ण संपत्तीचे निर्माण करण्यासाठी किमान तीनपेक्षा जास्त वर्षांच्या गुंतवणुकीचा अवधी संभाव्य गुंतवणूक–दाराच्या हातात असायला हवा.

अहमदनगर येथील आदिपर्व कन्सल्टन्सीचे आदित्य देशपांडे म्हणाले की लार्ज कॅप आधारित अनेक म्युच्युअल फ़ंड उत्पादने असली तरी सातत्यपूर्ण कामगिरी करणारा आयसीआयसीआय प्रुडेन्शियल ब्ल्यूचिप फंड हा एक फंड आहे. या श्रेणीतील सरासरीपेक्षा अधिक सरासरी परतावा देण्याचा त्याचा इतिहास आहे. या फंडाचा खरेदी करून धरून ठेवायचा दृष्टिकोन असून शेअरची निवड करताना तो खालून वर जातो. नफा निर्माण करण्यासाठी पोर्टफोलियोची सर्व क्षेत्रांमध्ये उत्तम प्रकारे विभागणी करण्यात येते. या फंडाने २९ फेब्रुवारी पर्यंत एक वर्षाचा ३९.३७ टक्के एवढा चमकदार परतावा दिला असून तीन व पाच वर्षांमध्ये क्रमशः २०.४२ टक्के आणि १८.७४ टक्के परतावा दिला आहे.

श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती(५ वी) परीक्षेत २० विद्यार्थी पात्र झाले असून सोनवणे आराध्या सुभाष २४२ गुण, साठे सोहम प्रविण २२८ गुण, शिंदे ओवी आशिष २२४ गुण, मरकड वरद विकास २०८ गुण व कारखेले आराध्या प्रताप २०४ गुण मिळवून यश प्राप्त केले. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती(८ वी) परीक्षेत डहाळे अनुष्का वैभव १९० गुण, डमाळ मनस्वी नितीन १८० गुण व शिंदे रितेश कल्याण १६४ गुण मिळवून पात्र झाले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयात सत्कार करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सेक्रेटरी ॲड.विश्वासराव आठरे, सहसेक्रेटरी जयंत वाघ, खजिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे सदस्य डॉ.बाळकृष्ण मरकड, चंद्रकांत म्हस्के, अरविंद आठरे, काशिनाथ पा. लवांडे, सरपंच इलियास शेख, विद्यालयाचे प्राचार्य मच्छिंद्र गोसावी, पर्यवेक्षक केशव जाधव व दादासाहेब मरकड यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना विद्यालयातील शिक्षक किरण दानवे, प्रशांत शिंदे, राजेंद्र हंडाळ, प्रविण साठे, सुवर्णा अकोलकर, प्रेरणा कदम व सीमा ठाकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# आगडगाव येथील काळभैरवनाथ देवस्थान परिसरात पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय

## उन्हाळ्यात पक्ष्यांना वाचविण्यासाठी विजय भालसिंग यांचा पुढाकार, झाडाला टांगले धान्य व पाण्याची भांडी

आगडगाव येथील काळभैरवनाथ देवस्थान परिसरात पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय करताना विजय भालसिंग, बलभीम कराळे, साहेबराव गायकवाड, त्रिंबक साळुंके, दिलीपकुमार गुगळे, मुरलीधर कराळे, संजय भालसिंग आदी.

नगर – उन्हाळ्यात तीव्रतेने वाढत चाललेले तापमानात पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून विजय भालसिंग यांनी आगडगाव (ता. नगर) येथील श्री क्षेत्र काळभैरवनाथ देवस्थान (ट्रस्ट) परिसरातील झाडांवर पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय केली. झाडाला धान्य व पाण्याची भांडी टांगण्यात आली. उन्हाळ्यात वाढत्या तापमानात पक्ष्यांना वाचविण्यासाठी श्री. भालसिंग यांनी हा सामाजिक उपक्रम हाती घेतला असून, विविध ठिकाणी ते पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय करत आहे.

या उपक्रमाप्रसंगी श्री क्षेत्र काळभैरवनाथ देवस्थानचे ट्रस्टचे अध्यक्ष बलभीम कराळे, उपाध्यक्ष साहेबराव गायकवाड, सचिव त्रिंबक साळुंके, खजिनदार दिलीपकुमार गुगळे, सल्लागार मुरलीधर कराळे, वाळकीचे संजय भालसिंग, विश्वस्त संभाजी कराळे, दिलीप गायकवाड, तुळशीदास बोरुडे, नितीन कराळे आदी उपस्थित होते.

दिवसं–दिवस उन्हाची तीव्रता वाढत असताना ४० अंशापेक्षा अधिक तापमानाची नोंद होत आहे. पक्षी पाण्यासाठी व अन्नासाठी भटकंती करीत आहे. वाढत्या तापमानात पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने अनेक पक्ष्यांना जीव गमवावा लागत आहे. ही जाणीव ठेऊन विजय भालसिंग यांनी डोंगर रांगा व मालरान येथील झाडांवर धान्य व पाण्याची भांडी टांगून पक्ष्यांची सोय करत आहे.

बलभीम कराळे म्हणाले की, पशुसेवा ही ईश्वरसेवाच आहे. मुक्या प्राण्यांना दया दाखविणे हे मनुष्याचे कर्तव्य आहे. भालसिंग यांनी राबवलेला उपक्रम युवकांसाठी आदर्श व दिशादर्शक आहे. उन्हाळ्यात तापमान झपाट्याने वाढत असताना पक्ष्यांसाठी ठिकठिकाणी अन्न–पाणीची सोय केल्यास ते जगू शकणार असल्याचे स्पष्ट केले. देवस्थानचे पदाधिकारी व विश्वस्तांनी भालसिंग यांनी राबविलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

विजय भालसिंग यांनी पशु–पक्ष्यांना जगविणे ही मनुष्याची नैतिक जबाबदारी आहे. निसर्गात मनुष्याने केलेल्या हस्तक्षेपामुळे तापमान वाढत चालले आहे. उन्हाळ्यात पक्षांना वाचवण्यासाठी सर्वांना जबाबदारी घ्यावी लागणार असल्याचे श्री. भालसिंग यांनी सांगितले.

# मुलांनी साकारले रामायण

## ईश्वराम्मा दिन सांस्कृतिक गुणदर्शनाला प्रतिसाद

भगवान श्री सत्यसाईबाबांच्या मातोश्री ईश्वराम्मा यांचा स्मृतिदिन विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम आध्यात्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सादरीकरणातून साजरा केला.

नगर – श्रीगणेश, श्रीकृष्ण गोपिंका, श्रीराम, सीता, लक्ष्मण, हनुमानांच्या वेशातील बालगोपाळांनी शिर्डी व सत्यसाई बाबांच्या भजनावर तल्लीन होवून सादर केलेले नृत्यविष्कार उपस्थितांची टाळ्यांची दाद घेऊन गेला निमित्त होते भगवान श्री सत्यसाई बाबांच्या मातोश्री ईश्वराम्मा यांचा ५२ वा स्मृतिदिन.

बालविकास विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कला–गुणांना प्रोत्साहन देणारा ‘ईश्वराम्मा दिन’ म्हणून जगात साजरा होतो, त्याप्रमाणे साईभक्त अशोक कुरापाटी यांच्या पुढाकाराने गेली ३५ वर्षे संस्कारक्षम, प्रबोधनात्मक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात साजरा झाला.

मंगळागौर व कठपुतली नृत्यातून स्त्री शक्तीच्या जागरासह प्रभू श्रीरामचंद्राच्या जन्मापासून रावण वधापर्यंत रामायणातील प्रसंग नृत्य–नाटिकेद्वारे मुलांनी जिवंत करुन भक्तीमय वातावरण राममय केले. उपस्थित प्रेक्षक–पालकांनी जय श्रीराम, सियावर रामचंद्रजी की जय, संकटमोचक जय हनुमानचा एकच जयघोष केला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर सादर केलेल्या गीतांमधून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह संचारला होता. पारंपारिक लोकगीतांनी उपस्थितांची मने जिंकली. टाळ्यांच्या कडकडाटात बालकांच्या कलागुणांना दाद देण्यात आली. आयोध्यातील रामलल्लांची प्राणप्रतिष्ठापनेच्या पार्श्वभुमीवर या सादरीकरणाने रामायणाची अनुभूती दिली. नाद मधुरांच्या वेदमंत्र घोषात वेशभुषा केलेल्या विद्यार्थ्यांचे माऊली सभागृहात आगमन झाले.

श्रमिकनगरच्या मार्कंडेय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेदसार, वेदमंत्र पठण, गायत्री मंत्र व महिशासुर स्त्रोत्र पठणाने शानदार प्रारंभ विविध देव–देवता, महापुरुशांची वेश परिधान केलेल्या बालकलाकारांचे हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात संयोजक अशोक कुरापाटी यांनी सत्यसाईबाबा व ईश्वराम्मांच्या मानवी सेवा कार्याची, आध्यात्मिक अनुभुतीची माहिती दिली.

कार्यक्रमात विविध देव–देवता, महापुरुषांच्या व्यक्तीरेखा बालकांनी सादर करुन आध्यात्मिक–सामाजिक–शैक्षणिक संदेश दिले. प्रगत इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा होत असलेला सदुपयोग व दुरुपयोग विषयी विडंबनात्मक उहापोह करुन सर्वांचीच चांगली कान उघाडणी केली. साईबाबांच्या जीवन कार्य संदेशावरील नाटिका सादरीकरण सर्वांच्या मनावर बिंबवून त्यांना अंतर्मुख केले. आरती विभुती प्रसाद वाटपाने या भक्तीमय कार्यक्रमांची सांगता झाली.

सांस्कृतिक कार्यक्रमांचे रचनाकार सौ.विद्या दगडे, वैशाली वरुडे, सुरेखा डावरे, सुप्रिया ओगले–जोशी, वर्षा पंडित, वैष्णवी कुलकर्णी, मानसी देठे, प्राजक्ता लोखंडे आदिंचा शालाबाह्य संस्कारक्षम उपक्रमांसाठी धडपडणारे पालक प्रा.वृषाली मांडे, मंजुषा देशमुख, अनिता सिद्धम यांच्या हस्ते गौरविण्यात आले. व प्रमुख अतिथींचा सत्कार साई समितीचे मार्गदर्शक प्रा.आर.जी.कुलकर्णी, प्रा.सौ.ज्योती कुलकर्णी, श्रीकृष्ण धर्माधिकारी, जिल्हाप्रमुख नंदलाल भालेराव, निमंत्रक अमोल सप्तर्षी, ज्येष्ठ साईभक्त नरसिंग दुसा, सौ.शोभा दुसा यांनी केला. एकपात्री कलाकार प्रा.विजय साबळे यांनी सूत्रसंचालन केले.

# सुंदरबाई आणि ज्योती भोगाडे यांचा आदर्श सासू व सुन पुरस्काराने सन्मान

आदर्श सासू
आदर्श सून

जि.प. प्राथमिक शिक्षिका ज्योती भोगाडे आदर्श सून व सुंदरबाई भोगाडे आदर्श सासू स्व.सौ. ललिता बलदोटा यांच्या स्मरणार्थ पुरस्कार स्विकारल्यानंतरचे छायाचित्र.

नगर – जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षिका ज्योती भगवान भोगाडे व त्यांच्या सासूबाई सुंदरबाई भाऊसाहेब भोगाडे (रा. निंबोडी, जामखेड रोड) यांना आदर्श सासू व सुन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्व.सौ. ललिता बलदोटा यांच्या स्मरणार्थ पद्मश्री पोपट पवार व आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते भोगाडे सासू व सुनेला पुरस्कार देण्यात आला. यावेळी राजेंद्र बलदोटा, प्राजक्ता बलदोटा, हर्षल ओसवाल, प्रियंका ओसवाल उपस्थित होते.

शहरातील बुरुडगाव रोड येथील नक्षत्र लॉन्स मध्ये हा पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी पद्मश्री पोपट पवार यांनी आजच्या व पूर्वीच्या कुटुंब व्यवस्थेवर भाष्य केले. व्याख्याते अविनाश भारती यांनी आदर्श सासू व आदर्श परिवार यावर मार्गदर्शन केले.

ज्योती भोगाडे म्हणाल्या की, या मागील २१ वर्षापासून जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणून कार्य करत आहे. सासू व सासरे शेती करत असून, दोघांनीही पंच्च्यात्तरी पार करुन आनंदाने राहत आहे. नोकरीला लागण्यापूर्वी सासू सुंदरबाई भोगाडे यांनी प्रोत्साहन देऊन कुटुंबाचा सांभाळ केला. घरापासून लांब राहून नोकरी केली. आजही त्या भक्कमपणे पाठिशी उभ्या असल्याने नोकरी करता आली. त्या अशिक्षित असताना सुनेच्या नोकरीसाठी त्यांनी दिलेले पाठबळ प्रेरणादायी आहे.

सासूबाईने नोकरीबरोबरच मुलांना घडविण्यात मोठे योगदान दिले. मोठा मुलगा हरिदास अमेरिकेत असून, त्याने तिथे ४०० एकर जमीन घेतली आहे. तो नोकरीबरोबर शेतीही करतो. मोठ्या जाऊबाई प्रभावती भोगाडे एक शिक्षिका असून, अमेरिकेतील शाळेत त्या अध्यापन करण्याचे काम करतात. पती भगवान भोगाडे एक शेतकरी असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करत आहे.

दोन नणंद अंगणवाडी सेविका असून, शेती व उद्योग व्यवसायात प्रगतीपथावर आहेत. हा संपूर्ण कुटुंब सासूबाई यांच्या संस्कार व मार्गदर्शनाने उभा राहिला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय गौरवसाठी प्रस्ताव पाठवावे

## कर्तृत्ववान महिलांचा होणार सन्मान, निसर्गोपचारावर व्याख्यानाचे आयोजन

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ३१ मे रोजी विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा राज्यस्तरीय अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय गौरवाने सन्मानित केले जाणार आहे. सामाजिक, शैक्षणिक, उद्योजक, अध्यात्मिक, पत्रकारिता, आरोग्य, पर्यावरण, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांना प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हा जयंती सोहळ्याचा कार्यक्रम सावेडी येथील माऊली सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमाप्रसंगी निसर्गोपचार तज्ञ संजीवनी स्वागत तोडकर यांचे महिला आरोग्य, निसर्गोपचाराद्वारे विविध उपचार पद्धती या विषयावर व्याख्यान होणार आहे. तर मेक–अप आर्टिस्ट अलका गोविंद महिलांना सौंदर्य खुलविण्यासाठी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करणार असल्याची माहिती आंतरराष्ट्रीय मेकअप आर्टिस्ट तथा अहिल्या फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. कावेरी कैदके व सुवर्णा कैदके यांनी दिली.

महिलांचा गौरव केला जाणार असून, २० मे पर्यंत आपले प्रस्ताव अहिल्या मेकओव्हर, एकविरा चौक, पाईपलाईन रोड या पत्त्यावर पाठवावे.

अधिक माहितीसाठी ९९२१७१२३१२ क्रमांकवर संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# हरीत धनराई व्यापक करण्याच्यादृष्टीने ‘मोबाईल सीड्स बँके’साठी पुढाकार

## कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यांद्वारे फळांच्या बिया गोळा करण्याचा प्रस्ताव

नगर – ग्लोबल वॉर्मिंगमुळे संपूर्ण सजीव सृष्टीला धोका निर्माण झाला असताना ग्लोबल वॉर्मिंग विरुध्द संजीवनी ठरणाऱ्या हरीत धनराई व्यापक करण्याच्या उद्देशाने लोकभज्ञाक चळवळीच्या माध्यमातून मोबाईल सीड्स बँकेसाठी पुढाकार घेण्यात आला असल्याची माहिती ॲड. कारभारी गवळी यांनी दिली.

हरित धनराईमुळे कार्बन–डायऑक्साइडचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटणार आहे. त्याचबरोबर भूगर्भातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात वाढू शकेल. पावसाळ्याच्या दिवसात धनराई असलेला प्रदेश थंड राहिल्यामुळे पावसाचे ढग तयार होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण वाढल्याशिवाय राहणार नाही. या धनराईमुळे शेतकऱ्यांना किंवा शहरी भागातील लोकांना नॅनो धनराईतून आर्थिक उत्पन्न मिळणार आहे. शेतकऱ्यांना इतर पिकांच्या मानाने नॅनो धनराई विक्रीतून नक्कीच दीडपट उत्पन्न मिळू शकणार असल्याचा विश्वास संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न सर्वसामान्य समाजाच्या मानसशास्त्रात आहे. सर्वसामान्यपणे मला काय त्याचे? अशी प्रवृत्ती सगळीकडे दिसून येते, परंतु प्रत्येक माणसाने आज हा गंभीर विचार केला नाही तर त्याच्या पुढच्या पिढ्यांना हजारो संकटांना तोंड द्यावे लागणार आहे. कुटुंबातील सर्वांनी एकत्र येऊन हरित धनराई किंवा नॅनो धनराई उभी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. भारतामध्ये सुमारे १५ ते २० कोटी जोडपे आजी–आजोबा झालेले आहेत आणि कुटुंबामध्ये आजी आणि आजोबा व नातवांमध्ये सुसंवाद नाही. याला कारण संस्काराचा अभाव, परंतु नॅनो धनराईमुळे कुटुंबातील तिन्ही पिढ्या एकत्र आनंदाने राहू शकणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतातील प्रत्येक शहरात कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्यांमध्ये तिसरा कप्पा तयार करून घरोघरी खाल्ल्या जाणाऱ्या फळांच्या बिया गोळा करण्याचा प्रस्ताव या मोहिमेच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. हजारो टन फळांच्या बिया नष्ट होण्याऐवजी जंगल पेरीसाठी उपलब्ध होऊ शकणार आहेत. लोकभज्ञाक चळवळीने प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेच्या घंटागाड्यांना मोबाईल सीड्स बँकेच्या दर्जा देऊन कायद्याने बिया गोळा करण्याचे काम निश्चित करावे. यासाठी सरकारकडे आग्रह धरला जाणार असल्याची भूमिका मांडण्यात आली आहे.

देशातील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने नॅनो धनराईला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी मोबाईल टँकर सुद्धा उपलब्ध केले पाहिजे. विशेषत: प्रत्येक शहरातील रस्त्याच्या कडेला अशा झाडांची लागवड करून डिसेंबर ते जूनपर्यंत पहिल्या तीन वर्षात सातत्याने पाणीपुरवठा अशा झाडांना केला पाहिजे. देशातील स्थानिक स्वराज्य संस्था नव्याने झाड लावण्याबाबत उदासीन आहेत. त्यामुळे प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ३० टक्के नगरसेवकांच्या जागा या हरित चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी आरक्षित करावे अशी मागणी संघटनेने केली असल्याची माहिती ॲड. गवळी यांनी दिली. या मोहिमेसाठी अशोक सब्बन, ओम कदम, प्रकाश थोरात, जालिंदर बोरुडे, शाहीर कान्हू सुंबे, विठ्ठल सुरम आदी प्रयत्नशील आहेत.

## समीरची यशोगाथा

**अचिव्हर**

संघ लोक सेवा आयोगाच्या परीक्षा देण्यासाठी परिक्षार्थी आयुष्यातली तीन□ार वर्ष खर्ची घालतात. त्यामुळे स्पर्धा परीक्षा चांगल्या गुणांनी उतीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यापेक्षा जास्त अभिमानास्पद बाब असूच शकत नाही. दरवर्षी एमपीएससी/युपीएससी स्पर्धांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सर्वोच्च गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढे येतात. अलिकडेच युपीएससी परीक्षेचे निकाल जाहीर झाले. त्यात नागपूरचे समीर प्रकाश खोडेंनी महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम तर देशामध्ये ४२ वा नंबर पटकावला. मेहनतीने यश साध्य करणारे खोडे सध्या रायपूर येथील भारतीय रेल्वे सेवेमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून केमिकल इंजिनिअरिंगमध्ये पदवी आणि आयआयएम लखनौमधून एम.बी.ए. केले. रेल्वे मंत्रालयामध्ये रुजू होण्यापूर्वी केडरमधील आय.आर.टी.एस. या कंपनीमध्ये त्यांनी सुमारे सात वर्षे काम केले. रेल्वे मंत्रालयासाठी काम करत असतानाच आयएएस अधिकारी होण्याची इच्छा मनात बाळगून नागरी सेवा परीक्षांची तयारी सुरू केली.

'युपीएससी'मध्ये यश मिळालेल्या धाकट्या भावाच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. त्यांच्या या प्रवासामध्ये भावाचे आणि मित्र आय.ए.एस. शुभम भाईसारे यांचेही मार्गदर्शन लाभले. कोणत्याही परीक्षेची तयारी करत असताना त्या विषयाचा पाया पक्का असण्याची आवश्यकता असते. त्यामुळे त्यांनी या परीक्षेसाठी संबंधित विषयांचे जुने पेपरसेट अभ्यासले तसेच वर्तमानपत्राचे रोज वाचन करणे फायदेशीर ठरले. खेरीज संबंधित पुस्तकांचा योग्य वापर करून ज्ञानात भर घातली. परीक्षेसाठी आवश्यक विषयाचे ज्ञान आणि जागरुकता या छोट्या पण महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष न करता त्यांनी आपला अभ्यास सुरू ठेवला.

कोणतेही यश आपल्याला एका प्रयत्नामध्ये मिळाले तर त्यांची किंमत राहत नाही, ही बाब खरी असली तरी आलेले अपयश स्वीकारून पुढे जाण्याची तयारी ठेवावीच लागते. पहिल्या प्रयत्नामध्ये झालेल्या चुका सुधारून पुढे गेल्यामुळे खोडे यांना ही यशाची पायरी गाठता आली. आजची पिढी करिअरबाबत जागरुक तर आहेच खेरीज अपयशाने लगेच खचून जाणारी सुद्धा आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करत असतानाच तुमच्या पाठीशी एखादा बॅकअप असायला हवा. म्हणजे अपयश आले तरीसुद्धा तुमचा आत्मविश्वास टिकून राहील आणि पुढील आयुष्याला धीराने सामोरे जाऊ शकाल, असे त्यांचे सांगणे आहे.

# जोश

### शेर की जुबानी

आने से पहले तेरी सजाते
कहां से फूल
मौसम बहार का तो तेरे
साथ आया है।

माना गलती हुई है हमसे
पर ऐसे खामोश ना हो जाइये।
जो दोगे सजा कुबुल होगी हमें।
बस एक बार मुस्कुरा जाइये।

ख्वाब तुटे है मगर हौसले जिंदा है
हम वो है जहां मुश्कीलें शरमिंदा है।

### हाऊ टू!

## पेटीएमवरून काढा अनावश्यक माहिती!

पेटीएम अकाउंटवरून तुम्ही अनावश्यक माहिती डिलीट करू शकता. त्यासाठी पेटीएम ॲप उघडा आणि प्रोफाइलवर जा. 'केवायसी' सेक्शनमध्ये जाऊन 'रिमूव्ह केवायसी' बटणावर क्लिक करा. खात्रीसाठी तुमचा पेटीएम पासवर्ड टाका. यात तुमचे केवायसी डिटेल्स डिलीट होऊ शकतात. ट्रान्झॅक्शन हिस्ट्री डिलीट करण्यासाठी 'पासबुक' वर जाऊन तुम्हाला नको असणारे ट्रान्झॅक्शन निवडा. 'ऍड' बटणावर क्लिक करा आणि 'रिमूव्ह ट्रान्झॅक्शन' निवडा. ॲड्रेस काढण्यासाठी प्रोफाइलवरील ॲड्रेस सेक्शनला जाऊन 'ॲड्रेस रिमूव्ह' बटण दाबा. मोबाईल नंबर रिमूव्ह करण्यासाठी 'सेफ्टी सेटिंग्ज' सेक्शनमध्ये जा. 'चेंज मोबाईल नंबर' ऑप्शनवर क्लिक करा. फील्डमध्ये तुमचा नवीन मोबाईल नंबर टाका. जुन्या मोबाईल नंबरवरून मिळालेला ओटीपी टाका. 'कन्फर्म' बटणावर क्लिक करा.

### ॲप वर्ल्ड

## एआय कॅमेरा असणारा पहिला फोन



मोटोरोला कंपनीचा बहुप्रतीक्षित मोटो एज ५० प्रो ५ जी स्मार्टफोन अखेर लाँच झाला आहे. या फोनमध्ये ४५०० एएमएच क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे. यात १२५ वॅट वायर्ड आणि ५० वॅट वायरलेस फास्ट चार्जिंग सपोर्ट मिळतो. या फोनमध्ये जगातील पहिला एआय □ॉवर्ड प्रोग्रॅम कॅमेरा आहे. दोन व्हेरिएंटमध्ये हा फोन खरेदी करता येईल. ८ जीबी रॅम, २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंटची किंमत २९,९९९ रुपये आहे. १२ जीबी रॅम, २५६ जीबी स्टोरेज व्हेरिएंट ३३,९९९ रुपयांना खरेदी करता येईल. स्पीड आणि मल्टीटास्किंग करताना हा फोन अजिबात हँग होणार नाही. या फोनमध्ये ५० मेगापिक्सल प्रायमरी कॅमेरा, १३ मेगापिक्सल मायक्रो अल्ट्रा वाईट कॅमेरा देण्यात आला आहे.

### सोशल मीडिया

## कमी किंमतीतला दमदार प्लान!

जिओने ९९९ रुपयांचा जिओ भारत व्ही २ फोन लॉन्च केला. आता कंपनीने या फोनसाठी प्रिपेड प्लॅन आणला आहे. याअंतर्गत ग्राहकांना २८ जीबी डेटा आणि अनलिमिटेड कॉलिंग देण्यात येत आहे. २३४ रुपये प्लॅनमध्ये २८ जीबी डेटा, अनलिमिटेड वॉइस कॉल आणि २८ दिवसांसाठी ३०० एसएमएस मिळणार आहेत. हा प्लान ५६ दिवसांसाठी वैध असून 'जिओ सावन', 'जिओ सिनेमा'चे फ्री सब्सक्रिप्शन देणार आहेत.

### स्मार्ट ट्रिक्स

## क्लिक फोटोज विथ डिफरंट मोड्स



सध्या दमदार कॅमेरावाले स्मार्टफोन बाजारात दाखल होत आहेत. मात्र कॅमेरा कितीही दमदार असला तरी फोटो तुम्हालाच काढायचा असतो. मोबाईल कॅमेऱ्यामध्ये बरेच मोड्स असतात. शिवाय तुम्ही मॅन्युअल सेटिंग करूनही उत्तम फोटोग्राफी करू शकता. चालती गाडी, बस किंवा खेळाडूंचा फोटो घ्यायचा असेल तर कॅमेऱ्याचा बर्स्ट मोड ऑन करा. फोनमध्ये एचडीआर ऑटो मोड असतो. या मोडमुळे तुम्हाला वेगळ्या पद्धतीने फोटो काढायची संधी मिळते. या मोडमुळे कॅमेरा विविध रंग अगदी सहज टिपतो. यासोबतच एक्सपोजर, ऑप्टिकल झूम, लाईव्ह फोकस अशा मोड्सचा वापर करू शकता.

## पोषक आहार हवा

**फिटनेस फंडा**

उकाड्याचा सामना करायचा तर रोगप्रतिकारशक्ती उत्तम हवी. यासाठी नियमित व्यायाम तर हवाच शिवाय पोषक आहारही घ्यायला हवा. पोषक आहार घेतल्यास आपण कोणत्याही परिस्थितीवर मात करू शकू. म्हणूनच उष्णतेचा प्रकोप असणाऱ्या या काळात कोणत्या घटकांचा आहारात समावेश करायला हवा? जाणून घेऊ.

✽ शरीरात जीवनसत्त्वं, खनिजं तसंच इतर पोषक घटकांची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात विविधरंगी फळं आणि भाज्यांचा समावेश करा.

✽ सध्याच्या काळात ताणतणावही वाढला आहे. हा ताण कमी करणं आवश्यक आहे. तणाव कमी करण्यासाठी डार्क चॉकलेटचं सेवन करण्याचा सल्ला दिला जात आहे. डार्क चॉकलेटमधला कोकोआ नावाचा घटक तणाव कमी करायला मदत करतो.

✽ हळद घातलेलं दूध प्यायल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढू शकते. त्यामुळे सकाळी किंवा संध्याकाळी हळदीचं दूध प्या.

✽ शरीराला चांगल्या फॅट्सची आवश्यकता असते. यासाठी आक्रोड, बदामाचं सेवन करता येईल. आहारात ऑलिव्ह तसंच मोहरीच्या तेलाचा समावेश करता येईल.

✽ दररोज योगा, श्वसनाचे व्यायाम आणि धावणं, चालण्यासारखे व्यायाम करून तुम्ही तंदुरूस्त राहू शकता. मुख्य म्हणजे जंक फूड टाळा आणि आरोग्यदायी पदार्थांचं सेवन करून रोगप्रतिकारक शक्ती वाढवा.

## पायलट व्हायचे आहे?

**करिअर**

काहींची स्वप्नं लहानपणापासूनच ठरलेली असतात. काहीतरी वेगळं करण्याची काहींना आवड असते. त्यापैकी एक म्हणजे पायलट होण्याचं अनेकांचं स्वप्न असतं. तुम्हालाही १२ वी नंतरच पायलट बनायचे असेल तर पायलट ट्रेनिंग प्रोग्राम जॉईन करु शकता. त्यासाठी तुम्हाला काय करावे लागेल? जाणून घेऊ या.

✽ पायलट होण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुम्ही १२ वी शास्त्र शाखेतून पूर्ण केलेलं असावं. पण काही पायलट ट्रेनिंग संस्था वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनाही प्रवेश देतात. त्यासाठी विद्यार्थ्यांचे वय कमीत कमी १७ वर्ष असले पाहिजे. पायलट बनण्यासाठी फिटनेस आणि मेडिकल प्रमाणपत्रही द्यावे लागते.

✽ एयरलाइन्स ट्रान्सपोर्ट पायलट, प्रायव्हेट पायलट, स्पोर्ट्स पायलट, फ्लाइट इन्स्ट्रक्टर आणि एयरफोर्स पायलट हे पायलटचे पाच प्रकार असतात. प्रत्येक प्रकाराच्या अभ्यासासाठी वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्था असतात.

✽ १२ वी नंतर पायलट होण्यासाठी कमर्शियल पायलट ट्रेनिंग प्रोग्राममध्ये प्रवेश घ्यावा लागतो. यासाठी एक प्रवेश परीक्षा आणि मुलाखतही होते. मुलाखतीमध्ये उत्तीर्ण झाल्यावर मेडीकल टेस्ट द्यावी लागते. या अभ्यासक्रमासाठी साधारणत: १५ ते २० लाख रुपये खर्च होतात.

✽ भारतीय वायुदलातून पायलट बनण्यासाठी एन.डी.ए. परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागते आणि हा तीन वर्षांचा कोर्स पूर्ण झाल्यावर फ्लाइंग ट्रेनिंगमध्ये भाग घ्यावा लागतो.

## पुन्हा पारख गरजेची

**मॅच मेकिंग**

माझं नुकतंच लग्न ठरलं आहे. होणाऱ्या नवऱ्याला तीन वेळा भेटल्यानंतर मी होकार दिला. त्या भेटींदरम्यान त्याची वागणूक खूप चांगली असायची. आमच्यात चांगला संवाद झाला. मात्र साखरपुड्यानंतर त्याचं वागणं अचानक बदललं. तो मला टाळू लागला. याबाबत मी माझ्या वडिलांशी चर्चा केली. त्यानंतर त्यांनी त्याची भेटही घेतली. त्यावेळी सर्व काही ठीक असल्याचं त्याने स्पष्ट केलं. पण त्याच्या वागण्यात काहीच बदल झाला नाही. याबाबत विचारलं असता मी जाड आणि उतावळी असल्यामुळे असं वागत असल्याचं तो म्हणाला. लग्नाबाबत तो खूपच गोंधळल्याचं दिसतंय. तो डॉक्टर आहे. आमच्या पत्रिकाही जुळल्या आहेत. मात्र या परिस्थितीत मी काय करायला हवं?



**उत्तर :** शरीराच्या ठेवणीवरून तुझा अनादर करायचा अधिकार कोणालाही नाही. तो तुझा आदरच करत नसेल तर त्याच्यासोबत आयुष्य घालवायचं की नाही याचा पुन्हा विचार कर. होणाऱ्या नवऱ्याशी बोल. त्याच्या वागणुकीचा तुला त्रास होत असल्याचं स्पष्टपणे सांग. शारीरिक बदल कायमस्वरूपी नसतात. वजन कमी होऊ शकतं. पण या कारणामुळे तो तुझ्याशी वाईट वागू शकत नाही. नातं टिकून रहाण्यासाठी दोघांचाही एकमेकांना खंबीर पाठिंबा असायला हवा. नातं फुलायला हवं. पण याचीच कमतरता असेल तर अशा नात्यांना काहीच अर्थ उरत नाही. तू त्याच्याशी चर्चा कर. त्याला काय खटकतं हे जाणून घे. एखाद्यावेळी तू पटकन रिॲक्ट झाली असशील. प्रतिक्रिया आणि प्रतिसाद या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. तू तुझ्या स्वभावाचा आढावा घे. तू पटकन व्यक्त होतेस का, याचा विचार कर. स्वभावातले दोष दूर करण्याचा प्रयत्न कर. आयुष्यातल्या प्रत्येक टप्प्यावर तुला याचे लाभ होतील.

## लज्जत आलू फ्रँकीची

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो,उरलेल्या पोळीचं काय करायचं असा प्रश्न पडला असेल तर झटपट होणारी आलू फ्रँकी ट्राय करता येईल. सकाळचा नाश्ता किंवा इव्हिनिंग स्नॅक म्हणूनही तुम्ही ही रेसिपी बनवू शकता. हॉस्टेल स्टुडंट्सना हा पदार्थ नक्कीच आवडेल.

**सामग्री:** पोळ्या, चमचाभर तेल किंवा बटर, आलं□लसूण पेस्ट एक चमचा, तीन उकडलेले बटाटे, अर्धा चमचा लाल तिखट, एक छोटा चमचा गरम मसाला, अर्धा चमचा चाट मसाला, चिरलेली कोथिंबिर,चिरलेला कांदा, चवीनुसार मीठ

**कृती:** बटाटे सोलून कुस्करून घ्या. कढईत तेल किंवा बटर गरम करा. त्यात आलं□लसूण पेस्ट घालून थोडी परता. त्यात बटाटे, तिखट, गरम मसाला, चाट मसाला, कोथिंबीर आणि मीठ घाला. सर्व घटक एकजीव करा. मिनिटभर परता. हे सारण बाजूला ठेवा. आता गॅसवर तवा ठेवा. त्यावर थोडं बटर घाला. पोळ्या थोड्या भाजून घ्या. त्यावर चिरलेला कांदा, बटाट्याचं सारण, थोडा चाट मसाला घाला. हे मिश्रण पोळीवर नीट पसरवा. आता पोळीचा घट्ट रोल करा. वरच्या कडा दुमडून घ्या. टिश्यू पेपर किंवा ॲल्युमिनियम फॉईलमध्ये गुंडाळून सॉससोबत खा. याच पद्धतीने चीज, पनीर फ्रँकी करता येईल.

## आकर्षक व्यक्तिमत्त्वासाठी...

**ग्रुमिंग**

व्यक्तिमत्व आपल्याला इतरांपेक्षा वेगळे बनवते. ओळख करून देताना तुम्ही साधारणपणे नाव आणि तुमच्याबद्दल आवश्यक असलेली एखादी गोष्ट सांगता. पण, महत्त्वाचं म्हणजे व्यक्त होण्याआधीचं तुम्ही देहबोलीद्वारे स्वत:बद्दलची खूप माहिती देत असता. घर, परिसर, शाळा, कॉलेज किंवा कामाच्या ठिकाणी तुमचं व्यक्तिमत्त्व हेच महत्त्वपूर्ण ओळख बनतं. म्हणूनच यशाच्या जवळ जाण्यासाठी उत्तम व्यक्तिमत्व असणं गरजेचं आहे. ते घडवायचे कसे? पाहू या.

* ज्ञान वाढवा : ज्ञान वाढेल तितकं तुमचं व्यक्तिमत्त्व सुधारेल. जास्त ज्ञान असणाऱ्यांकडे लोक लवकर आकर्षित होतात. यासाठी प्रत्येक नवीन विषय सखोलपणे जाणून घेण्याचा प्रयत्न करा आणि त्याचा नीट अभ्यास करा. ज्ञान वाढल्याने व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होतात.

* सकारात्मक विचार : चांगले व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी सकारात्मक मानसिकता ठेवणं अत्यंत गरजेचं आहे. सकारात्मक राहिला तर आजूबाजूच्या लोकांनाही सकारात्मक ऊर्जा जाणवेल आणि ते तुमच्याकडे आकर्षित होतील.

* त्रुटी सुधारा : व्यक्तिमत्व सकारात्मक ठेवण्यासाठी कमकुवतपणावर काम करणं महत्त्वाचं आहे. म्हणून, स्वत:मधील कमतरता समजून घ्या आणि त्या स्वीकारा. शक्य तितक्या लवकर त्यावर मात करुन दूर करण्याचा प्रयत्न करा.

* अडचणींना धैर्याने सामोरे जा : स्वतःला कम्फर्ट झोनमधून बाहेर काढा. मनात भीती निर्माण करणाऱ्या प्रत्येक कठीण प्रसंगाचा सामना करा. यामुळे आत्मविश्वास वाढेल आणि तुमचं व्यक्तिमत्वही सुधारण्यास मदत होईल. आयुष्यात अडचणी येतच राहतात. पण त्यांना पूर्ण आत्मविश्वासानं सामोरं जा. अडचणींकडे नकारात्मक दृष्टिकोनातून नव्हे तर सकारात्मक दृष्टिकोनातून पाहा.

## अतिसुंदर स्पिती व्हॅली

**भटकंती**

हिमाचल प्रदेश हे भारतातलं एक सुंदर राज्य. हिमालयाच्या कुशीत वसलेलं हिमाचल पर्यटनाचं प्रमुख केंद्र आहे. इथल्या अनेक व्हॅलीज लक्ष वेधून घेतात. इथे येऊन तुम्ही काही निवांत क्षण घालवू शकता. हिमाचलमधली स्पिती व्हॅली खूप प्रसिद्ध आहे. सध्या अनेक जण निसर्गाच्या सानिध्यात राहून काम करत आहेत. तुम्हालाही ताजंतवानं होण्यासाठी फिरायला जायचं असेल तर स्पिती व्हॅलीचा पर्याय निवडायला हरकत नाही. स्पिती व्हॅलीमध्ये ट्रेकर्सची चांदी असते. इथल्या निसर्गात निवांत ट्रेकिंग करता येतं. स्पिती व्हॅली जवळचं धनकर सरोवर खूप सुंदर आहे. या सरोवरापर्यंतचा ट्रेक आहे. धनकर सरोवराकडे जाताना कजा आणि तबो ही शहरं लागतात. धनकर नावाच्या गावातून साधारण तासभर ट्रेकिंग केल्यावर धनकर सरोवर येतं. हे सरोवर समुद्रसपाटीपासून १४ हजार किलोमीटर उंचीवर आहे.

या सरोवराचं पाणी पिता येतं. मात्र पाण्याची बाटली सोबत नेणं योग्य ठरतं. इथे येणाऱ्या पर्यटकांची गाडी धनकर मॉनेस्ट्री लगत पार्क केली जाते आणि मग ट्रेकिंगला सुरूवात होते.

धनकर ट्रेकला जाताना केळी, सुकामेवा असे पदार्थ सोबत न्या. यामुळे तुम्हाला आवश्यक ती ऊर्जा मिळू शकेल. ट्रेकिंगची आवड असेल तर स्पिती व्हॅलीला नक्की जा. इथला निसर्ग तुम्हाला खुणावेल. शिवाय ताजंतवानंही करेल.

# महायुतीचे उमेदवार सुजय विखे ५ लाख मताधिक्याने विजयी होतील

## दिलीप सातपुते यांचे प्रतिपादन

लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार खा.डॉ.सुजय विखे यांच्या प्रचारासाठी यांच्या प्रभाग ९ मधील भागात प्रचारफेरी काढण्यात आली.

नगर – खा.सुजय विखे यांनी गेल्या पाच वर्षात शहरात व मतदारसंघात करोडो रुपयांचा विकासनिधी आणून अनेक मोठे विकासकामे मार्गी लावत मतदारसंघाचा विकास केला आहे. विकासकामांमुळे जनता त्यांच्याबरोबर आहे. त्यामुळे या निवडणुकीत सुजय विखे हे ५ लाख मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास शिवसेनेचे शहरप्रमुख दिलीप सातपुते यांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांच्या प्रचारासाठी प्रभाग निहाय घर चलो अभियाना अंतर्गत रविवारी सायंकाळी शहर उपाध्यक्ष धनंजय जाधव यांच्या प्रभाग ९ मधील भागात प्रचारफेरी काढण्यात आली. यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड.अभय आगरकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबू टायरवाले, दिलीप सातपुते, मनसेचे जिल्हाप्रमुख सचिन डफळ, भाजपा सरचिटणीस प्रशांत मुथा, उपाध्यक्ष सचिन पारखी, मनसेच्या महिलाध्यक्षा अनिता दिघे, वसंत लोढा, गजेंद्र राशिनकर आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व क्रांतिवीर लहूजी वस्ताद यांच्या पुतळ्यास अभिवादन करून निघालेली ही प्रचारफेरी सिद्धार्थनगर, मुन्सिपल कॉलनी, बडोदा कॉलनी, जाधव मळा, कवडेनगर, गायकवाड मळा, महावीर नगर भागात फिरून सोनी मंगल कार्यालय येथे समारोप झाला.

यावेळी धनंजय जाधव म्हणाले, लोकसभा निवडणुकीसाठी सुजय विखे यांना विजयी करण्यासाठी महायुतील सर्व घटकपक्ष उत्साहात प्रचार करत असून सर्व भागांमध्ये नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद प्रचारफेऱ्यांना मिळत आहे. प्रभाग ९ मधील भागातून त्यांना सर्वात मोठा लीड आम्ही मिळवून देणार आहोत.

यावेळी पंडित वाघमारे, प्रिया जानवे, अनिता दिघे आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी राजू सातपुते, किरण दाभाडे, पोपट पाथरे, अक्षय गांधी, विकास घोरपडे, बाबासाहेब सानप, राहुल रासकर, बाळासाहेब भुजबळ, संतोष शिरसाठ, ज्ञानेश्वर काळे, राजेंद्र काळे, राहुल मुथा, सुरेखा विद्ये, सौ.भांगे, शशीकांत पालवे, मयूर बोचूघोळ, भैय्या परदेशी, सुमित बटूळे, स्वप्नील बेद्रे, गोपाल वर्मा, रणजीत परदेशी, सुनील सकट आदींसह महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रचारफेरी दरम्यान काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ब्रिजलाला सारडा यांची कवडेनगर येथे निवासस्थानी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेवून त्यांच्या तब्येतीची चौकशी केली.

अभय आगरकर यांनी प्रचार पत्रक देवून भाजपला मतदान करण्याची विनंती सारडा यांना केली. यावेळी सारडा यांनी स्वागत करून नरेंद्र मोदीच पुन्हा देशाचे पंतप्रधान होणार असल्याचे सांगितले. यावेळी मधुसूदन सारडा, अनंत देसाई उपस्थित होते.

# मतदार जागृतीवर निबंध व पोस्टर स्पर्धेचे आयोजन

## डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाचा उपक्रम

नगर – निमगाव वाघा येथे स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी निबंध व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार मतदारांमध्ये जागृती करण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. निबंध स्पर्धेसाठी माझे मत माझे भविष्य, एका मताची शक्ती, मतदान राष्ट्रीय कर्तव्य, मी नव्या युगाचा मतदार, सशक्त लोकशाहीतील निवडणुक व मतदान प्रक्रिया हे विषय देण्यात आले आहेत. निबंध हा पाचशे शब्दा पर्यंत असावा.

मतदार जागृतीवर पोस्टर स्पर्धेसाठी घोषवाक्यांचा वापर करुन आपल्या कल्पनाशक्तीने चित्र काढायचे आहे. या स्पर्धेत आपल्या मनातील मतदार जनजागृतीवर विषय व संकल्पना मांडण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. निबंध आणि पोस्टर स्पर्धा शालेय व महाविद्यालयीन अशा दोन गटात होणार आहे.

लोकशाही सदृढ होण्यासाठी युवकांसह प्रत्येक नागरिकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग महत्त्वाचा आहे. भारत हा युवकांचा देश असून, युवकांनी जागृकतेने मतदान प्रक्रियेत सहभाग घेतल्यास मतदानाची टक्केवारी वाढणार असल्याची अपेक्षा संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी व्यक्त केली आहे.

स्पर्धकांनी निबंध व पोस्टरच्या प्रवेशिका १० मे पर्यंत संस्थेचे कार्यालय स्व.पै.किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, अध्यक्ष पै. नाना डोंगरे, निमगाव वाघा, ता. जि. अहमदनगर ४१४००५ या पत्त्यावर पाठवावे व अधिक माहितीसाठी ९२२६७३५३४६, ८६०५७७५२६१ या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

# समता पार्टीचा वचननामा जाहीर

## अंधारलेल्या शिर्डीत बॅटरीच्या टॉर्चच्या माध्यमातून विकासकामाचा प्रकाश पाडणार : भारत भोसले

नगर – शिर्डी लोकसभा मतदारसंघात समता पार्टीचे अधिकृत उमेदवार भारत संभाजी भोसले यांच्या वचननाम्याचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी ते म्हणाले की, विकास कामाच्या अभावामुळे अंधारलेल्या शिर्डी लोकसभा मतदारसंघात बॅटरी टॉर्च च्या माध्यमातून विकास कामांचा प्रकाश पाडून दाखवणार व अच्छे दिन आले नाही म्हणून सच्चे दिन आणणार व शेतकऱ्यांचा मुलगा व मतदार संघात राहणारा असल्याने २४ तास आपल्या सेवेसाठी उपलब्ध राहणार असून बेरोजगार तरुणांना प्रशिक्षण देऊन स्वतःच्या व्यवसायाचे मालक बनविणार कांदा, टोमॅटो, भाजीपाला यासारख्या मालाची पावडर बनवणाऱ्या सामूहिक कंपन्या काढणार त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट व चांगला भाव मिळणार तसेच सामूहिक कंपन्या आल्यामुळे प्रत्येक घरातील शेतकरी कंपनीचे मालक होणार मतदार संघात १०० टक्के दारू बंद करणार तसेच शेतकऱ्यांचा मुलगा असल्याने शेतकऱ्यांच्या समस्यांची जाणीव असून सरकारी शाळा शिक्षण चांगल्या दर्जाचे बनविणार अंगणवाडी सेविका मदतनीस आशा वर्कर यांच्यासाठी केंद्रात आवाज उठविणार व समस्या सोडविणार गावागावात समता दरबार भरून गावातल्या समस्या गावातच सोडवणार शासकीय योजनांचा पाठपुरावाही गावातच सरकारी अधिकारी बोलवून केला जाणार तसेच सरकारी हॉस्पिटल चांगल्या दर्जाचे चांगले डॉक्टर स्टाफ असणारे बनविणार संविधानाचे रक्षण करून सर्वांना योग्य न्याय मिळावा याची दक्षता घेणार पंतप्रधान जर चुकीचे काम करत असतील तर त्यांना दिल्लीत जाऊन नडेल असा एकमेव उमेदवार मी राहणार रस्ते, पाणी, दळणवळण या समस्यांचा शंभर टक्के पाठपुरावा करणार असल्याची भावना समता पार्टीचे अधिकृत उमेदवार भारत संभाजी भोसले यांनी वचननाम्यात म्हटले आहे.

# हिवरेबाजारचे गावकरी करणार मतदानाचे नियोजन

## मतदारांसाठी वाहनेही देणार, ठराविक उमेदवारालाच मतदान करण्याचे बंधनही नाही

आदर्श मतदान प्रक्रिया राबविण्याबाबत हिवरेबाजार येथील ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना पद्मश्री पोपटराव पवार.

नगर – पद्मश्री पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकासात आदर्श निर्माण करणाऱ्या हिवरेबाजारमध्ये आदर्श मतदान प्रक्रिया अनुभवण्यास मिळणार आहे. विविध उमेदवारांशी समन्वय साधून त्यांच्या पोलींग एजंटांची, तसेच निवडणूक प्रक्रियेसाठी आलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांची व्यवस्था गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येणार आहे.

गावकऱ्यांच्या वतीने प्रशासन तसेच उमेदवारांना पत्र पाठवून गावामध्ये आदर्श पध्दतीने राबविण्यात येणाऱ्या मतदान प्रक्रियेबाबत अवगत करण्यात आले आहे. हिवरे बाजारकरांच्या आदर्श निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्येक उमेदवार प्रत्येक घरात जावून त्यांचे काम मतदारांपर्यंत पोहचवू शकतो. त्याला कोणतेही बंधन नसते. मात्र मतदान प्रक्रियेमध्ये उमेदवारांच्या पोलींग एजंटची निवड गावकरी करतात. मतदारांना मतदान केंद्रापर्यंत येण्यासाठी गावकऱ्यांच्या वतीनेच वाहनांचीही व्यवस्था करण्यात येते. कोणत्याही मतदारास ठराविक मतदाराला मतदान करण्याची सक्ती करण्यात येत नाही. त्यामुळेच सन १९९७ पासून हिवरेबाजारमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले आहे.

पूर्वी संपूर्ण मतदारसंघातील गावांमध्ये झालेले मतदान एकत्र करण्यात येत असे. त्यामुळे निकालानंतर उमेदवारांमध्ये फारसे गैरसमज होत नसत. ईव्हीएम मशिनचा वापर सुरु झाल्यानंतर मात्र प्रत्येक बुथनिहाय, गावनिहाय प्रत्येक उमेदवाराला झालेले मतदान समजते. त्यामुळे कुठेतरी कमी जास्त झाले तर नाराजी नको याच भावनेतून ही व्यवस्था आमलात आणण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. पद्मश्री पोपटराव पवार हे देखील कोणाला मत द्या किंवा देऊ नका याबाबत गावकऱ्यांना काहीही सांगत नाही. प्रत्येक जण स्वतःच्या सद्सद्विवेक बुध्दीने मतदान करतो.

हिवरेबाजारच्या आदर्श मतदान प्रक्रियेमुळे मतदानात कुठेही बोगस मतदान, किंवा भेदभाव होत नाही. आजवरच्या निवडणूकांमध्ये सबंधित उमेदवारांना गावकऱ्यांना पुर्ण सहकार्य केलेले आहे. गावात आलेल्या उमेदवाराचे शाल नारळ देऊन स्वागत करण्यात येते. या निवडणूकीत पोलींग एजंट अथवा बुथच्या दृष्टीने उमेदवाराचे काही नियोजन असल्यास ते कळविण्याबाबतही सुचित करण्यात आले आहे.

### ग्रामपंचायत निवडणुकीतही आदर्श मतदान प्रक्रिया

हिवरे बाजार ग्रामपंचायतीची ३५ वर्षानंतर निवडणूक झाली. यापूर्वी बिनविरोध निवड होत असे. या निवडणूकीतही आदर्श मतदान पध्दतीचा अवलंब करण्यात आला. प्रत्येक मतदार स्वतःच्या वाहनातून मतदानासाठी येत होता. तर वस्त्यांवरील मतदारांसाठी गावकऱ्यांच्या वतीने वाहनांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे वाद, विवाद, तंटा, भांडण, मतदारांना दारू अथवा पैशांचे आमिष या गोष्टी घडल्या नाहीत. निवडणूका या लोकशाहीच्या कणा आहेत, या पध्दतीने लोकशाही बळकट करण्याचा हिरवेबाजार ग्रामस्थांचा प्रयत्न आहे.

# ज्येष्ठ नागरिकांचा पाठिंबा आणि त्यांच्या अनुभवातून आपला विजय निश्चित : निलेश लंके

## कल्याण रोड, ज्येष्ठ नागरिक महासंघाचा जाहीर पाठिंबा

कल्याण रोड येथील ज्येष्ठ नागरिक महासंघाच्यावतीने महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. याप्रसंगी उमेदवार निलेश लंके, शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, बाळासाहेब हराळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष खासेराव शितोळे, संजय शेंडगे, सचिन शिंदे, अनिल बोरुडे, शाम नळकांडे, दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दिपक खैरे, संतोष गेनप्पा, संदिप दातरंगे आदि.

नगर – ज्येष्ठ नागरिक हे समाजाचा मुख्य कणा आहेत, त्यांनी आपल्या उमेदीच्या काळात नोकरी, व्यवसायाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही मोठे योगदान दिलेले असते. त्यांनी अनेक उन्हाळे पावसाळे पाहिले असल्याने त्यांचा एकंदरीत अनुभव हा दांडगा असतो. या अनुभवाचा उपयोग युवा पिढीसाठी मार्गदर्शक असतो. कल्याण रोड परिसरातील विकासात ज्येष्ठ नागरिकांचे मोठे योगदान राहिले आहे. या भागातील लोकप्रतिनिधींच्या सहकार्यातून हा भाग चांगला विकसित होत आहे. या भागाला आदर्शवत करण्यासाठी आपले कायम सहकार्य राहील. त्यांचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांसाठी सर्वच पातळ्यांवर प्रयत्न करु. आज या ज्येष्ठ नागरिकांनी आपणास पाठिंबा देऊन त्यांच्या अनुभवातून आपला विजय निश्चित केला आहे, असे प्रतिपादन उमेदवार निलेश लंके यांनी केले.

कल्याण रोड येथील ज्येष्ठ नागरिक महासंघाच्यावतीने महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. याप्रसंगी उमेदवार निलेश लंके, शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम, बाळासाहेब हराळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष खासेराव शितोळे, संजय शेंडगे, सचिन शिंदे, अनिल बोरुडे, शाम नळकांडे, दत्ता जाधव, प्रशांत गायकवाड, दिपक खैरे, संतोष गेनप्पा, संदिप दातरंगे आदिंसह ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

याप्रसंगी संभाजी कदम म्हणाले, निलेश लंके यांची सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी नेहमीच तळमळ राहिली आहे. कोणीही त्यांच्याकडे काम घेऊन गेल्यास रिकाम्या हाताने परतत नाही. अशा कार्यक्षम व्यक्तीस लोकसभेत पाठविण्याचा निर्धार नगरकरांनी केला आहे. त्यामुळेच सर्वस्तरातून त्यांना पाठिंबा मिळत आहे. नगरमधूनही महाविकास आघाडीचे सर्वच पक्ष त्यांच्या विजयासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले.

यावेळी बाळासाहेब हराळ म्हणाले, सध्याचे खासदार आपल्या भागात कधी फिरकलेच नाही, ते फक्त निवडणुकीपुरते मतदार संघात दिसतात. नागरिक, शेतकरी, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच आघाडीवर ते अपयशी ठरले आहेत. त्यामुळे निलेश लंके यांचा विजय निश्चित असल्याचे सांगितले.

याप्रसंगी खासेराव शितोळे म्हणाले, आज ज्येष्ठ नागरिकांचे अनेक प्रश्न आहेत, त्याकडे सर्वच दुर्लक्ष करतांना दिसत आहेत. परंतु आज जेष्ठ नागरिकांची संख्या आणि अनुभव पाहता ते जिद्दीला पेटल्यावर काहीही करु शकतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना दुर्लक्षित करुन चालणार नाही. त्यांचे पेन्शन, मानधन व त्यांच्यासाठीच्या शासनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. उमेदवार निलेश लंके यांनी आमच्या प्रश्नांसाठी केंद्र व राज्य पातळीवर प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

# सत्तापेंढारी यांना सत्तेतून पायउतार करण्यासाठी डिच्चू कावा तंत्र

## चांगले दिवस आणण्यासाठी लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्तीशिवाय पर्याय नाही : अ‍ॅड. कारभारी गवळी

नगर – संसदीय लोकशाहीमध्ये राजकारणाचा धंदा करणाऱ्या सत्तापेंढारी यांचा सत्तेतून पायउतार करण्यासाठी डिच्चू कावा तंत्राचा वापर करुन लोकभज्ञाकशाहीचा अवलंब करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनने सुरु केलेल्या लोकभज्ञाक मोहिमेला सर्व स्तरातून प्रतिसाद मिळत आहे. या लोकसभा निवडणुकीत मतदारांमध्ये जागृती निर्माण करुन सत्तापेंढारी यांना धडा शिकवला जाणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

सत्तापेंढारी हे सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा कामाशिवाय मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. अशा सत्तापेंढाऱ्यांनी लोकशाहीला कर्कासुर होऊन दगा फटका केला आहे. या कर्कासुरांनी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पैशाच्या जोरावर मतकोंबाड अशी नवी जात तयार केली आहे. त्याशिवाय मध्यमवर्गीय आणि शिकलेल्या लोकांनी मला काय त्याचे, असे म्हणून ढबुमकात्या असा नवीन वर्ग तयार केला आहे. त्यामुळे सत्ता पेंढाऱ्यांना मागच्या दाराने सत्ता मिळवणे सोपे झाले आहे. यावर जालीम उपाय म्हणून डिच्चू कावा हे लोकअस्त्र लोकभज्ञाक चळवळीने तमाम मतदारांना उपलब्ध केले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पाश्चिमात्य समाजाने चंगळवाद पोसला आणि भारतीयांनी हा चंगळवाद पोसण्यासाठी भ्रष्टाचार, अनागोंदी, टोलवा टोलवी यांचा वापर केला आहे. भारतीयांनी पूर्वीपासूनच मोक्ष मिळवण्यासाठी आणि पुरुषार्थ साधण्यासाठी विश्वातील महान शक्तीची भक्ती आजपर्यंत चालू ठेवली. त्यातून समाजाच्या हितापेक्षा पश्चिमेकडीचे संस्कृतीने भौतिक स्वार्थ साधला, तर पूर्वेकडच्या संस्कृतीने अध्यात्मिक स्वार्थ जोपासला. परंतु महात्मा गांधीजींनी या दोन्ही मार्गापेक्षा गौतम बुद्धांचा मध्यम मार्ग स्वीकारून सजीव आणि लोकांच्या ठिकाणी असणाऱ्या चैतन्याची भक्ती केली. त्यातूनच आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. या देशातील सत्तापेंढारी पद्धतीच्या लोकशाहीमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी लोकभज्ञाकशाही आणण्यासाठी पर्याय नसल्याचे म्हटले आहे.

लोकध्यानाय शरणम गच्छामी..., ज्ञानाय शरणम गच्छामी..., कर्माय शरणम गच्छामी...! या मंत्राचा वापर लोकभज्ञाक चळवळीने सुरू ठेवला आहे. सजीवांसाठी आणि देशबांधवांसाठी केलेल्या कार्यातून आपला अनुभव आणि ज्ञान वाढते. या अनुभवाचा फायदा लोक कल्याणासाठी केल्यामुळे पुन्हा कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढतो. मतदारांना पैसे वाटून किंवा जातीच्या नावावर मते मागून लोककल्याण कधीच होऊ शकणार नाही. आजही प्रत्येक शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात झोपडपट्ट्या आहेत. १० वर्षात कोट्यावधी लोकांना घरे देण्याचे आश्वासन देऊन त्याची अंमलबजावणी करता आलेली नाही. एकंदरीत लोकप्रतिनिधी म्हणून मिरवणारे लोकप्रतिष्ठा आणि संपत्ती मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. जनता आपल्या हक्काविषयी उदासीन आहे. त्यामुळे या देशाला अतिशय चांगले दिवस आणण्यासाठी लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती याशिवाय काही एक पर्याय नसल्याचे अ‍ॅड. गवळी यांनी म्हंटले आहे.

देशातील प्रत्येक शिक्षण संस्था ही ज्ञानमंदिर झाले पाहिजे. ज्या ठिकाणी आपण काम करतो, त्याचे रूपांतर कर्म मंदिरात केले पाहिजे. तरच २१ व्या शतकाच्या मध्याला आपण माणूस म्हणून आपली जबाबदारी पूर्ण करण्याचा आनंद मिळवू शकणार आहे. भक्ती, ज्ञान आणि कर्म या तीन अध्यात्मिक मार्गांचा वापर धर्मनिरपेक्ष पद्धतीने भारताचे संविधान राबविण्यासाठी आणि कायद्याचे राज्य आणण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. जगभर मार्क्सवाद, समाजवाद, भांडवलशाही इत्यादी पद्धतीचा आग्रह धरण्यात आला. परंतु लोकभज्ञाक वाद याला काही एक पर्याय नाही. माणूस म्हणून राहण्यासाठी या पद्धतीशिवाय जगामध्ये दुसरी कोणतीही तत्त्वप्रणाली नाही. कोणत्याही धर्माच्या व्यक्तीला लोकभज्ञाक वाद नाकारण्याचे काहीएक कारण नसल्याचे म्हंटले आहे. लोकभज्ञाक चळवळीचा विस्तार व्यापक करण्यासाठी अ‍ॅड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, शाहीर कान्हू सुंबे, विठ्ठल सुरम, ओम कदम, जालिंदर बोरुडे, अशोक भोसले आदी प्रयत्नशील आहेत.

# शरद क्यादर यांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्याचे आदेश

नगर – शहरातील श्री मार्कंडेय मंदिर गांधी मैदान या देवस्थानच्या भूमिपूजन सोहळ्याविरोधात आमरण उपोषणास बसण्याचा इशारा शरद लिंगप्पा क्यादर यांनी दिला होता. त्यांच्या निवेदनाची जिल्हाधिकारी यांनी गंभीर दखल घेतली असून, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

याची दखल घेऊन क्यादर यांना उपोषणापासून परावृत्त करावे तसेच त्यांच्या अर्जासंदर्भात उचित योग्य ती कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी यांनी उप धर्मदाय आयुक्त अहमदनगर यांना सुचित केले आहे.

मतदानाची टक्केवारी वाढली पाहिजे, या ट्रेकॅम्पतर्फे चाँदबिबी महालापर्यंत आयोजित महिलांच्या बाईक रॅलीत सहभागी झालेल्या नेहा जग्गी, आरती खाडिलकर, आशा भालेराव, अनुराधा जाधव आदी.

# मतदान जागृतीसाठी 'एम्प्रेस बाईकर्स' सरसावल्या

## चाँदबिबी महालापर्यंत महिलांची बाईक रॅली; नागरिकांना पटवून दिले मतदानाचे महत्त्व

नगर – ट्रेकॅम्पचा उपक्रम असलेल्या 'एम्प्रेस बाईकर्स' ग्रुपच्या सदस्यांनी मतदान जनजागृती करण्यासाठी बाईक रॅली काढली. लोकशाहीसाठी मतदान कसे महत्त्वाचे आहे याबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली. त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. सध्या देशात निवडणुकीचे वारे वाहत आहे. निवडणूक पाच टप्प्यांत होत आहे. नगरमध्ये १३ मे रोजी मतदान होत आहे. मात्र, दिवसेंदिवस नागरिकांमध्ये मतदानामध्ये उदासीनता दिसून येत आहे. मतदानाची टक्केवारी वाढली पाहिजे यासाठी ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून आगळा-वेगळा उपक्रम राबविला. ट्रेकॅम्पच्या 'एम्प्रेस बाईकर्स' या महिलांच्या टीमने मतदानाची जनजागृती करण्यासाठी बाईक रॅली काढली. सावेडीतील प्रोफेसर कॉलनी चौकातून या रॅलीला सुरुवात झाली. स्वानंदी हास्य क्लबच्या संस्थापिका छाया बंडगर यांच्या हस्ते रॅलीला झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला.

रॅलीमध्ये सहभागी झालेल्या महिलांनी मतदान जनजागृतीचे फलक दाखवत व घोषणा देत रॅली चाँदबिबी महालापर्यंत काढली. तेथे फिरण्यासाठी आलेल्या पर्यटक व निसर्गप्रेमींना निवडणूक मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले. देशाचे भवितव्य घडविणाऱ्या या निवडणुकीत मतदारांची उदासीनता कशी घातक ठरू शकते याबाबतची माहिती एम्प्रेस बाईकर्सनी नागरिकांना दिली. त्यांनीही चांगला प्रतिसाद दिला.

या रॅलीमध्ये नेहा जग्गी, आरती खाडीलकर, आशा भालेराव, अनुराधा जाधव, प्रिती वेंढे, अश्विनी मुथियान, रचना काकडे, प्रतिभा महामिने, प्रतीक्षा जगदाळे, रितिका रंगलानी, प्रतीक्षा पोरवाल यांनी सहभाग घेतला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## पाहिजेत

दुकानात कामासाठी दोन मुले

: समक्ष भेटा :

**सुदर्शन टी कंपनी**

जुना दाणे डबरा, अ.नगर

---

## Urgent Require

Accountant - 2
Supervisor - 2
(Male Female both are applicable)

Add - Pandharipul MIDC

- Contact -

**9890918280**

---

## ऑफिस बॉय पाहिजे

१० वी १२ वी
गरजू व प्रामाणिक, फोर व्हिलर चालकास प्राधान्य.

**8806767111**

---

## पाहिजेत

मराठी, इंग्रजी टायपिंग झालेले मुले व मुली कामासाठी पाहिजे

कामाचे स्वरुप :
मराठी, इंग्रजी टायपिंग व ऑनलाईन वर्कींग
(ऑन वर्कमध्ये माहिती दिली जाईल)

**सैंदाणे असोसिएटस्**

ऑफिस नं.२४ अ‍ॅण्ड १८,
तहसिल ऑफिस समोर, टि.व्हीं.सेंटर,
सावेडी, अ.नगर

**8446496415**
**7387568759**

नोट : जॉब रिज्युम घेऊन येणे

---

## होलसेल मेडिकल करिता पदवीधर मुलगा पाहिजे

कॅश हॅण्डल करणे, बँकींग कामे इ.
अनुभवींना प्राधान्य

**9422222217**

---

## घरातील कामासाठी पूर्णवेळ अनुभवी बाई पाहिजे

राहण्याची व्यवस्था
आकर्षक पगार

प्रेमदान चौक, धर्माधिकारी मळा

**07218880037**

---

## प्लंबिंग आणि हार्डवेअर दुकानासाठी स्टाफ पाहिजे

✻ मार्केटिंग- १ जागा । ✻ दुकान कामासाठी- १ जागा

अनुभवी उमेदवारास प्राधान्य

**श्रीपाद ट्रेडर्स अ‍ॅण्ड अक्षय सोलर पॉवर**

पत्ता : हॉटेल राजवीर शेजारी, राजवीर कॉर्नर,
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर - ४१४००३

9552840802
8668376556

---

## कामगार पाहिजेत

५ जागा

भरपुर पगार

**सजन प्लायवुड**

शॉप नं.०२ मार्केट यार्ड, अ.नगर

**9422220183**

---

Hotel **Meghnand**®

MULTICUSINE PURE VEG RESTAURANT & LAWNS

यामाहा शोरुम शेजारी, नगर-मनमाड रोड, सावेडी, अ.नगर. मो. 9172833992

### स्टाफ भरणे आहे

- चायनिज कुक : १
- तंदुर कुक : १
- सिक्युरिटी : २
- वेटर : ६
- हेल्पर : ६
- स्टोअर किपर : १
- रेस्टॉरंट मॅनेजर : १
- किचन सुपरवायझर : १
- कॅशिअर : १
- मोरी कामगार (महिला/पुरुष) : ६

इच्छुक उमेदवारांनी अर्जासह समक्ष भेटावे. वेळ : सकाळी ११ ते २, सायं. ५ ते ७

---

## पेट्रोल पंपावर काम करण्यासाठी पंप ऑपरेटर पाहिजे

**नायरा पेट्रोल पंप**

बालिकाश्रम रोड, सावेडी, अ.नगर.

**9922199909**

---

## हॉस्पिटलमध्ये कामासाठी भरपूर संख्येने सिक्युरिटी गार्ड पाहिजेत

मामा + मावशी

सुपरवायझर : २ जागा

लेडी ऑफिस असिस्टंट

पत्ता : मिश्रा सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर सर्व्हिस
सद्गुरू क्लासिक अपार्टमेंट, पवननगर, भिस्तबाग,
नवीन तलाठी कार्यालयाशेजारी, सावेडी, अ.नगर

9422222241 / 8888886073
8888889041

---

## पेस्ट कंट्रोल

झुरळ, वाळवी, मुंग्या, उंदीर, कोळी, ढेकूणसाठी

मो. 7276423997 | 9272424705

---

अक्षय तृतीया निम्मित घरी आणा

## आनंदाची पेटी

अस्सल हापूस
आंब्याची पेटी

आजच बुक करा तुमचा आंबा

**बाळासाहेब भाजीवाले**

१००% नैसर्गिक आंबा । घरपोहोच सेवा

बुकिंगसाठी संपर्क : 8793909090 | 9156563106

---

**UFO** Fries & Corn

प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर

ही जाहिरात दाखवा आणि मिळवा
स्मॉल मॉकटेल फ्री..फ्री

टिप : २००/- रु. किंवा अधिकच्या खरेदीवर ही ऑफर लागू*

---

## रुग्णसेवा व मसाज होम सर्व्हिस

अपंग अर्धांगवायु असलेले अतिवृद्ध व बेडवर असलेल्या रुग्णांना घरी येऊन सेवा दिली जाईल.

प्रोफेशनल पध्दतीने मसाज

तसेच घरी येऊन फुलबॉडी मसाज करुन मिळेल

FULL BODY MASSAGE (मंथली बेसेसवर सुद्धा उपलब्ध)

9850127508 / 8830275190

---

## जाहीर निवेदन

आमची संस्था मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को ऑप क्रे. सोसा. लि. चे वसुली कर्मचारी **श्री. संदिप नारायण पाचारणे** हे मागील सात महिन्यापासुन संस्थेच्या सेवेत नाहीत.

तरी मंगलदीप मल्टीस्टेटच्या सर्व कर्जदार सभासद यांना कळविण्यात येते की, **श्री. संदिप नारायण पाचारणे** यांचेशी कर्जदार सभासद यांनी कर्ज वसुली व कर्ज हप्ते जमा करणे संदर्भात कुठलाही आर्थिक रोख किंवा ऑनलाईन व्यवहार करू नये तसे केल्यास होणाऱ्या गैरव्यवहारास किंवा नुकसानीस संस्था जबाबदार असणार नाही. स्वत: व्यवहार कर्ता सभासद जबाबदार राहील. याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू
**प्रशासकीय अधिकारी**
मंगलदीप मल्टीस्टेट अर्बन को-ऑप
क्रेडीट सोसायटी लि., अहमदनगर

---

## 2BHK फ्लॅट विकणे

ज्ञानेश्वरनगर, एकवीरा चौक, फुल फर्निश, ९०० स्क्वे.फूट फ्लॅट विकणे आहे

**8483881635**
**9623404949**

---

## विकणे आहे

आनंदनगर स्टेशनरोड, रोडटच ४ बीएचके, वेल फर्निचर सोलरसह दुसरा मजला विकणे आहे

**8446116768**

---

## गुजरगल्ली येथे 1BHK फ्लॅट भाड्याने देणे

**9834023726**
**7972511275**

---

## ऑफिस भाड्याने देणे आहे

कोठी रोड येथील दुसऱ्या मजल्यावरील ४०० स्क्वे.फूट, पूर्ण फर्निचर असलेले ऑफिस भाड्याने देणे.

बालाजी ट्र्व्हल्स, नगर

**9423161122**

---

## कापडबाजार, मोची गल्ली, अ.नगर येथे...

७,५०० मध्ये रेन्टने शॉप उपलब्ध..

एकाच ठिकाणी लेडीज अ‍ॅक्सेसरीजमध्ये सर्वकाही...

✻ ऑफर मर्यादित कालावधीसाठी ✻ सर्व सुविधांयुक्त
✻ सी.सी.टिव्ही. कॅमेरे
✻ पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वॉशरुमची सुविधा

अशा व्यवसायाची सुवर्ण संधी पुन्हा नाही...

- अधिक माहितीसाठी संपर्क -

**9270570699**

---

## दोन मजली रो-हौसिंग विकणे

दोन मजली रो-हौसिंगचे सुस्थितीत असलेले घर नवलेनगर, गुलमोहर रोड, आम्रपाली गार्डनच्या मागे, सावेडी, अ.नगर

**8329717020**

---

## प्युअर म्हशीचे शेणखत विकणे आहे

**8687343434**
**9921225714**

---

उपनगरामधील आपल्या आवडीचे प्राईम लोकेशन गुलमोहोर रोड टच

bappa RESIDENCY

P52200045823

## 2 BHK स्पेशियस फ्लॅट

साइटचा पत्ता : बाप्पा रेसिडेन्सी, पारिजात चौक, आम्रपाली गार्डन समोर, गुलमोहोर रोड, अहमदनगर.

**NAVLE BUILDERS**
Promoters | Builders | Developers
Ahmednagar | Chattrapati Sambaji Nagar

Office : Gurupadma Appartment, Gujar Lane, Ahmednagar.

**9326221864/ 7776862345**

---

## शिबीर । शिबीर ॥ शिबीर ॥।

**डॉ.अद्वैत गिते**
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन

नगरमध्ये प्रथमच जपानच्या अत्याधुनिक निहॉन कोडेन मशिनवरील EMG, EEG, NCV, VEP तपासणी शिबीर

कालावधी : १५ मे २०२४ पर्यंत.. ५० टक्के तपासणीत सवलत

सपर्क साधा.

## अक्षय (गिते) हॉस्पिटल

बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136

रोज दुपारी १ ते ५ या वेळेत एशियन नोबल हॉस्पिटल, प्रेमदान चौक, अ.नगर

---

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

**दिनांक : 03 ते 10 मे 2024**

BMCM
CREW
15
MAIDAAN
FALL
जुनं फर्निचर

| | |
|---|---|
| बडे मियाँ छोटे मियाँ | 10.00 PM |
| क्रु | 4.10 PM |
| मैदान | 12.45 PM |
| फॉल गाय | 11.15 AM, 7.15 PM |
| नाच ग घुमा (मराठी) | 8.30 AM, 10.00 AM, 1.45 PM<br>4.30 PM, 7.55 PM, 9.45 PM |
| जुन फर्निचर (मराठी) | 8.00 AM, 2.10 PM<br>5.05 PM, 10.35 PM |
| स्वरगंधर्व सुधिर फडके (मराठी) | 11.00 AM, 6.45 PM |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow **CONNPLEX** SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

---

Himalaya
3 Layer
PLASTO
RUF - TUF
पारस
TRIPLE LAYER
neo

१० वर्षे गॅरंटी सह

**उन्हाळ्यात पाणी स्टोरेजची चिंता सोडा..**

आजच खरेदी करा पिण्याच्या/रोज वापरच्या पाण्यासाठी
हिमालय, पारस, प्लास्टो व सिंटेक्स

या कंपन्यांच्या १०० लिटर ते ५००० लिटर पर्यंतच्या टाक्या उपलब्ध.

प्रो.प्रा. सुनिल बनकर पा.

**मे. अभय सेल्स**
कॉर्पोरेशन अँड हार्डवेअर

सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पिटल शेजारी, सातभाई मळा, दिल्लीगेट, अ.नगर.
☎ 8975979999, 9822542011

---

**VAISHNAVI TILES**
& TRADING CO.

◆ सर्व प्रकारच्या टाइल्स ◆ ग्रॅनाइट ◆ सॅनिटरी वेअर
◆ पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग ◆ C.P. फिटिंग्ज

9590151515 I 9262515151

VARMORA innovating happiness TILES • BATHWARE
KERAKOLL The GreenBuilding Company
CARYSIL German Engineered
colortile
RAK CERAMICS
India's No. 1 NIRALI BG
TIMEX
ICON WORLD OF TILE

प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

---

दि. ५ जून २०२४ रोजी

## कथाकार पूज्य पंडित प्रदिपजी मिश्रा (सिहोरवाले)

कुबरेश्वरसह तीन ज्योर्तिलिंग दर्शन यात्रा

प्रवास : ४ दिवस

✻ प्रेक्षणीय स्थळे ✻
देवगड, घृष्णेश्वर, भद्रामारुती, उज्जैन, कालभैरव, सिहोर, ओंकारेश्वर

2 x 2 आरामदायी स्लीपर कोच बसने प्रवास, निवास व भोजनासह

॥ श्री कुलस्वामिनी प्रसन्न ॥

श्री सुविधा यात्रा कंपनी संचलित

**AMAR PREM**
Holidays & Multiple services

✻ हेड ऑफिस ✻
श्री. सचिन रामभाऊ म्हस्के
सौ. सारिका सचिन म्हस्के
मो. [illegible]
युनियन बँकेसमोर, चितळेरोड, अ.नगर.

✻ पुणे ऑफिस ✻
सौ. संगिता महेश कंठाळे
श्रीमती. मिनाक्षी सोन्याबापू कंठाळे
मो. [illegible]
संभाजीनगर, चिंचवड पुणे - १९

✻ नाशिक ऑफिस ✻
श्री. प्रमोद नाम्दे
मो. [illegible]
शॉप नं. ७, स्टेशन रोड, [illegible]
[illegible], नाशिकरोड, नाशिक

✻ जालना ऑफिस ✻
श्री. कुणाल झारखंडे
मो. [illegible]
शॉप नं. ४१, मंडा रोड, [illegible]
[illegible], जालना

---

## दशक्रिया विधी

**कै.श्री.अंबादास आबासाहेब कासार**

स्व.दि-२९-०४-२०२४

कळविण्यात अत्यंत वाईट वाटते की, आमचे वडील कै.श्री.अंबादास आबासाहेब कासार यांचे सोमवार दि. २९-०४-२०२४ रोजी देवाज्ञा झाली. दशक्रियाविधी बुधवार दि. ०८-०५-२०२४ रोजी स. ९ वा. अमरधाम, केडगाव येथे होणार आहे

दु:खांकीत

गं.भा.कृष्णाबाई अंबादास कासार (पत्नी)
श्रीमती कल्हाबाई नाथा जगताप (बहीण)
श्रीमती पारुबाई जयवंत आढाव (बहीण)
श्रीमती शेवंताबाई शिवाजी चिपुळे (बहीण)
श्री.भगवान आबासाहेब कासार (भाऊ)
सौ.आशा शिवाजी जगदाळे (मुलगी)
सौ.वैशाली संदिप चौधर (मुलगी)
सौ.गितांजली अनिल काळे (मुलगी)

**समस्त कासार परिवार**

---

greenlibrary.in

EARTH's **Green Library**
Greenery for Every Space

Bring Nature's Serenity Home.

**Get Live Indoor Plant Today !**

Indoor Plants I Self Watering I Potted Planters I Premium Planters
Garden Accessories I Garden Furniture I Garden Lightings

Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools,
Zopadi Canteen, Savedi, Ahmednagar - 414003

**Amit Ajay Sanklecha** ☎ 99231 43334

---

जन्म असा लाभावा, देह चंदनाचा मिळावा ।
सहवास संपला तरी, सुगंध मात्र दरवळत रहावा ॥

आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रध्दांजली

## कै.सौ.स्वाती दिनेश सुळ

स्वर्गवास दि. २० एप्रिल २०२३

**प्रथम वर्षश्राध्द कार्यक्रम**

बुधवार दि. ०८ मे २०२४ रोजी, सकाळी ११.०० वा.

**शोकाकुल**

समस्त सुळ परिवार

**स्थळ**

विठ्ठल मंदीर
ठाकुर गल्ली, लोटके पतंगजवळ, तोफखाना, अहमदनगर.